
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क




• पुणे • वर्ष १५ वे • अंक १ ला • जुलै - सप्टेंबर २०१९ • किंमत रु. २०/- • पृष्ठसंख्या ४० • वार्षिक वर्गणी रु. १००/-

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!




पितांबरी
फार्म्स ॲन्ड ॲग्रो टूरिजम
कोकणातली शांती आणि सौंदर्य अनुभवा!
कोकणात एक नवं आकर्षण,
पितांबरी ॲग्रो टूरिझम!
यात काय पहाल?
• दापोली परिसरातले एकमात्र आयुर्वेद उद्यान.
• विविध सुगंधी फुले आणि गवताची लागवड.
• पितांबरी 'देवभक्ती अगरबत्ती' कारखाना पाहण्याची संधी.
• बैलगाडीतून रपेट.
• दापोलीत प्रशस्त बंगल्यात राहण्याची व स्वादिष्ट जेवणाची सोय.
हे आणि बरंच काही...
त्वरा करा... नोंदणीसाठी आजच संपर्क करा.
९८३३००७०६४, ९८६९६९९५५९
Pitambari Products Pvt. Ltd. : Thane: 022-67035555, Pune: 020-25390734, CIN: U24239MH1989PTC051314

| शहर : | सभासदाचे नाव व क्र.: | वर्गणी कालावधी |
|---|---|---|

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
ॐ
स्थापना
१९९१

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

**संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!**

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खासगी वितरणासाठी)


**वर्ष १५ वे** **जुलै-सप्टेंबर २०१९** **अंक २ रा**



**अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर**
**मोबा. : ९८१९८८५६६५**

**सचिव : श्री. गणेश गुर्जर**
**मोबा. : ९८९०९९०११३**

**कोषाध्यक्ष : श्री. संजय आंबर्डेकर**
**मोबा. : ९८२०४ १७९८१**



**संस्था नोंदणी क्र. महा-१४३६/२०१५ दि. २०/१०/१५ पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र एफ४६५२३ पी दि. ३/३/२०१६**


## संपादक मंडळ


**संपादक : श्री. हेमंत पुराणिक, ९९२३८ १०१९४**

**उपसंपादक : श्री. गोपाळ भाटवडेकर ९८५०९७९७०६**

**तंत्रज्ञ : श्री. सचिन ताटके, ९८६७१ ९२३१०**

**सल्लागार : श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली-सदस्य ९८३३१६३६५९**

**सदस्य : सौ. मेघा नाटेकर, ९६३७१५५९४८**
**श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, ९४०३७ ०२७३४**

**प्रकाशक : श्री. गणेश गुर्जर, ८१४९९ ०७७८९**


### जाहिरातीचे दर

| पान | एक वेळ | चार वेळा |
|---|---|---|
| पाव | रु. ५००/- | रु. २०००/- |
| अर्धा | रु. १०००/- | रु. ४०००/- |
| पूर्ण | रु. २०००/- | रु. ८०००/- |
| शुभेच्छा | रु. ५००/- | रु. २०००/- |
| पूर्ण पान रंगीत | रु. ३०००/- | रु. १२०००/- |
| पृष्ठदान | रु. २००/- | - |


**नियतकालिकाचे नाव** : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
**पत्ता** : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०
**संपादक : श्री. हेमंत पुराणिक**
**मुद्रक : श्री जे प्रिंटर्स प्रा. लि.**
**१४१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.**



**ऑफिस संपर्क : ०२०-२४४३२४४३ / मो. ८१४९९०७७८९**
email : bkbmsindia@gmail.com



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री गणेश गुर्जर यांनी मुद्रक श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.



शहर प्रतिनिधी-

श्री. प्रसाद पंडित, मुंबई, ९८६९१ ५५२१५
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९० ५१६५३
श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली, ९८३३१ ६३६५९
श्री. मनीष नवाथे, नागपूर ९८५०३ ३१४६० *
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ७७७३९ ७३६७९
श्री. भालचंद्र करंबेळकर, सातारा, ९०११० ६३०३०
श्री. दिलीप ढवळे, रत्नागिरी, ९४२२५ ४९०८५
श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८ ००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९० ३७३४१
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९४२८२३३१८८
श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, पुणे, ९४०३७ ०२७३४
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९ ९५८९२
श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७ ९९६९७
श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदुर्ग, ९४२३८ ८०१३८
श्री. अजित सरवटे, ठाणे, ९९८७२ ०५६९०
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१ ४८७७५


## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की, आपली वार्षिक वर्गणी आता रु. ३००/-, रु. ५००/- अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षांसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वत: रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी (पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी; कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे-३० च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे). शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक 055210110004008 असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयांतच पाठवावा. कृपया मनिऑर्डर पाठवू नये.

# अनुक्रमणिका

संपर्क

संपादक मंडळ

हेमंत पुराणिक
संपादक
मो. ९९२३८ १०१९४

गोपाळ भाटवडेकर
उपसंपादक
मो. ९८५०९ ७९७०६

गणेश गुर्जर
प्रकाशक
मो. ९८९०९९०११३

सचिन ताटके
तंत्रज्ञ सदस्य
मो. ९८६७१ ९२३१०

सौ. मेघा नाटेकर
सदस्य
मो. ९६३७१ ५५९४८

ऋषिकेश पळसुलेदेसाई
सदस्य
मो. ९४०३७ ०२७३४

प्रदीप हळबे
सल्लागार
मो. ९८३३१ ६३६५९

अविनाश मणेरीकर
सदस्य
मो. ९४२२३ ७९८७८

- संपादकीय ३
- गो प्रो- अनुपमा भाटवडेकर ४
- ये रे ये रे पैशा- वैशाली वर्णेकर ५
- त्रैलोक्यपावन विठ्ठलनाम- योगिता सातवळेकर ७
- भांडण - प्रदीप पु. सातवळेकर ८
- रक्तदान श्रेष्ठ दान - मोहन पळसुले ९
- पाणी फाउंडेशन सामाजिक काम - प्रभाकर करंबेळकर ११
- जायफळ - श्रीकृष्ण शांताराम आंबेकर १२
- रिटर्न गिफ्ट - श्री. बाळासाहेब भाटे १३
- कधी परतणार? -(एका फार सुशिक्षित कऱ्हाडे ब्राह्मण कुटुंबातील एकाची गाथा) -श्री. वा. ना. रायकर १४
- Diabetes Mellitus - Dr. Anish Alurkar. KBBF १५
- KBBF (कऱ्हाडे ब्राह्मण बेनेवोलंट फाउंडेशन) चे योगदान - यशोधन नाटेकर १६
- पितांबरीच्या पुणे येथील विभागीय कार्यालयाचे उद्घाटन - श्री. उदय आगाशे १८
- संस्थावृत्त-
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई १९
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, जि. ठाणे १९
  - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ २०
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे २१
  - कऱ्हाडे ब्राम्हण सेवा मंडळ, डोंबिवली, जि. ठाणे २२
  - कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली २३
  - कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली २३
  - सिंधुदुर्ग जिल्हा कऱ्हाडे ब्राह्मण संघ २४
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सोलापूर २५
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे २५
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ व राष्ट्रसेविका समिती, नागपूर २६
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई, चैत्रगौर वासंतिक हळदी-कुंकू समारंभ २६
  - सिंधुदुर्ग जिल्हा कऱ्हाडे ब्राह्मण, संघ लघुपट फिल्म फेअर पुरस्कार २०१९ २७
- तबला - एक शिकवण -अमित शहाणे २७
- गणितानंद कापरेकर - अश्विनी रानडे २९
- यशोगाथा : श्री. गजानन पाध्ये- शब्दांकन : सौ. मेघा नाटेकर ३१
- UPI-IT - बोक्या टेकबंडे ३३
- झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा स्मृतिदिन त्यानिमित्ताने
- ही काव्यरूपी श्रद्धांजली..- अविनाश मणेरीकर ३४
- वैयक्तिक माहिती व अभिप्राय ३५

सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
तसेच त्रैमासिकामध्ये काही नजरचुकीने मजकूर राहिल्यास क्षमा असावी.

– संपादक

# संपादकीय



नमस्कार

मंडळी

चैत्रातील सुखद, आल्हाददायक, वातवरणानंतर वैशाखाचा वणवा आपण सगळ्यांनीच अनुभवला आणि आपण पावसाची वाट चातकासारखी पाहत आहोत. 'ज्ञानोबा-तुकाराम' असा गजर करत वारकरी 'या वर्षी भरपूर पाऊस पडु दे' विठ्ठलाला साकडं घालण्यासाठी निघाले आहेत. दर वर्षीप्रमाणे या वर्षीही विठ्ठल या साऱ्या वारकऱ्यांच्या मनोकामना पूर्ण करेलच. त्यानंतर हिरवा शालू नेसून मखमलीचे गालिचे पसरून ही पृथ्वी नटल्यावर येणारा श्रावण म्हणजे सणांची मांदियाळीच. नागपंचमीला नागाचे पूजन, गौरीचे महिपूजन, नंतर येणारा उसळत्या दर्याच्या पूजेचा सण, त्याला जोडून येणारी बहीण-भावाचे नाते साजरे करणारी राखीपौर्णिमा आणि सगळ्यासोबत मोठी उत्सुकता आपल्या बाप्पाच्या आगमनाची. मंडळांच्या सजावटी, घरगुती गणपतींची सजावट, त्याची खरेदी, नंतर बाप्पांचे वाजत-गाजत होणारे आगमन... सगळ्यांनी एकत्र येऊन हे सण साजरे केल्याने कृतार्थ झालेलं नाती आणखी घट्ट करणारं वातावरण! अशीच आपली पण नाती घट्ट करूया... एकजूट वाढवू या... आपणा सर्वांना येणाऱ्या गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा !

एप्रिल ते जून या त्रैमासिकासाठी आपण जो मदतीचा हात पुढे केलात, तसेच कौतुकाची थाप पाठीवर देऊन आपण जो आमचा उत्साह वाढवला आहे; त्याबद्दल संपादक मंडळ आपणा सर्वांचे आभारी आहे. गेल्या अंकापासून आपण काही नवी सदरे सुरू केली आहेत. त्यातील पुढील भाग आपण या अंकात देत आहोत. जसे बोक्या टेकबंडे ऊर्फ केदार पाध्ये यांचे टेक्नॉलॉजीचे सदर, तसेच यशस्वी उद्योजकांची यशोगाथासुद्धा आहे. त्याचबरोबर या अंकापासून वैशाली वर्णेकर यांची 'ये रे ये रे पैशा' ही लेखमालादेखील सुरू करीत आहोत. याशिवाय अणखी नवी सदरे सुरु करायची आहेत. त्यासाठी सर्व कऱ्हाडे ज्ञातिबंधूंकडून सहकार्य अपेक्षित आहे.

या तसेच पुढील अंकपासून आपण काही नवी अणखी सदरे सुरू करीत आहोत. त्यामध्ये प्रवासवर्णन आहे, व्यक्तिविशेष आहे. गीतेवरील एक नवे सदर आपण सुरू करीत आहोत. त्याचबरोबर कलाविषयक सदर आहे. नव्या पुस्तकांचा परिचयदेखील आपण वाचकांना करून देणार आहोत. आरोग्यविषयक सदर या अंकापासून सुरू होत आहे. कायदा-सुव्यवस्थाविषयक नवे सदर सुरू करीत आहोत. याशिवाय अन्य नवीन विषय 'विविधा' या सदराखाली देण्याचा आमचा प्रयत्न आहे. 'संपर्क' अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे तसेच अंक वाचनीय करण्याचा आमचा मानस आहे. वाचकांनाही आम्ही असे आवाहन करतो की, त्यांनीसुद्धा वरील सदरांना अनुसरून लेख पाठवावेत. ते अंकामधून नक्की छापले जातील. या अंकात आपला लेख छापून यावा असे वाटत असेल, तर ३१ ऑगस्टपर्यंत आपले लेख संपर्कच्या कार्यालयात पाठवावेत. त्यानंतर आलेले लेख स्वीकारले जाणार नाहीत. लेख पाठवताना लेखकांनी सुवाच्य आक्षरांत लिहून अथवा कॉम्प्युटरवर युनिकोड फाँटमध्ये टाईप करून पाठवावेत अथवा फोटो काढून पाठवावा. तसेच आपली वैयक्तिक माहिती भरून देण्यासाठी त्रैमासिकमध्ये फॉर्म दिला आहे, तो भरुन पाठवावा. तसेच त्रैमासिक कसे वाटले याचा अभिप्राय देऊन तो कार्यालयास पाठवावा.

तसेच शहर प्रतिनिधींनाही आम्ही आवाहन करतो की, पुढील त्रैमासिकासाठी संस्थावृत वेळेत पाठवावे. या अंकासाठी संस्थावृत्त दिलेल्या मुदतीत न आल्याने ह्या अंकासाठी विलंब झालेला आहे. तरी इथून पुढे संपादक मंडळाने दिलेली तारीख लक्षात ठेवून त्या मुदतीपूर्वी संस्थावृत्त पाठवावे. दिलेल्या मुदतीनंतर आलेले संस्थावृत्त स्वीकारले जाणार नाही, तसेच ते त्या त्रैमासिकात छापलेही जाणार नाही. तरी कृपया सर्वांनी १० सप्टेंबरपूर्वी आपले संस्थावृत्त पाठवावे. त्यानंतर येणारे संस्थावृत्त स्वीकारण्यात येणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**संपादक मंडळ**

पुणे, दि. १५/८/२०१९

# गो प्रो

अनुपमा भाटवडेकर
+९१९८३३२२३४४८

प्रवासाला जाताना कॅमेरा जवळ बाळगणे तसे आपल्याला नवीन नाही; पण ट्रेकला, सायकल चालवताना, अगदी पोहोतानासुद्धा जर आपल्याला फोटो आणि व्हिडिओ काढता आले तर.. ह्याच खास कारणासाठी गोप्रो ॲक्शन कॅमेरा आणि इतर ॲक्शन कॅमेऱ्यांचा घेतलेला हा आढावा.

**१) गोप्रो हीरो ७ ब्लॅक**

गोप्रोने आणलेला हा एक अत्याधुनिक टचस्क्रीन ॲक्शन कॅमेरा आहे. हा कॅमेरा वापरायला अतिशय सोपा असून ह्यामध्ये कोणत्याही डिलेशिवाय ६० FPS ने 4K व्हिडिओ रेकॉर्डिंग करता येते.



नेहमीचे फोटो काढण्यासाठी ह्यामध्ये १२ मेगापिक्सेल कॅमेरा उपलब्ध आहे. ह्यामध्ये Slo-Mo व्हिडिओ 8x ने काढता येतात, जे ह्याच्या आधीच्या मॉडेल्समध्ये फक्त 2x ने काढता यायचे. हा कॅमेरा 256GB पर्यंतचे SD कार्ड सपोर्ट करतो. १० मीटरपर्यंत हा कॅमेरा वॉटरप्रूफसुद्धा आहे. ह्यामध्ये फोटो आणि व्हिडिओ काढण्यासाठी फोनमधल्या व्हॉइस कमांड देऊन ह्या कॅमेऱ्याने फोटो आणि व्हिडिओ काढता येतात. इन-बिल्ट GPS आणि Time Wrap, Time Lapse व्हिडिओ मोड्स ही ह्याची खास वैशिष्ट्ये. गोप्रो कॅमेराबरोबर येत असलेले Quik स्टोरीज ॲप्लिकेशन अँड्रॉइड आणि iOS वर इन्स्टॉल करून कॅमेऱ्याने काढलेले फोटो आणि व्हिडिओजचा एकत्रित असा व्हिडिओसुद्धा तयार करता येतो. ह्या कॅमेऱ्याने You Tube आणि **Facebook** वर लाईव्ह स्ट्रीमिंगसुद्धा करता येते. गोप्रो कॅमेरा ॲप्लिकेशन आपल्या अँड्राइड आणि iOS मोबाइल फोनवर इन्स्टॉल करून हा कॅमेरा पूर्णपणे कंट्रोल करता येतो. तसेच कॅमेरा वापरणे सोपे जावे ह्यासाठी Curved Surface Adhesive Mount आणि Flat Surface Adhesive Mount हे कॅमेऱ्यासोबतच दिले जातात.

किंमत अंदाजे - ३७०००

**२) SJCM² SJ8 Pro Sports Action Camera :-**

विंडोज फोन ऑपरेटिंग सिस्टिमवर चालणार ह्या कॅमेऱ्यामध्ये 4K व्हिडिओ रेकॉर्डिंग करता येते आणि १२ मेगापिक्सेलने नॉर्मल फोटो ह्यामधून काढता येतात. ह्यामध्ये WiFi ने कनेक्ट करण्याची सुविधा उपलब्ध आहे. हा कॅमेरा ३० मीटरपर्यंत वॉटर रेझिस्टन्ट असून पाण्याखाली वापरताना दिल्या गेलेल्या वॉटरप्रूफ केसचा वापर करणे फायदेशीर ठरते. ह्या कॅमेऱ्यामध्ये फक्त वाईड अँगलने शूट करता येते. ह्या कॅमेऱ्यासाठी SJCam ॲप्लिकेशन हे अँड्रॉइड आणि




iOS फोन्सवर उपलब्ध आहे. हा कॅमेरा विविध Accessories - जसे की Tripod mdapter, Adhesive Mount ह्यासोबतच उपलब्ध आहे, ज्यामुळे शक्यतो आणखी काही घ्यायची गरज भासत नाही.

किंमत अंदाजे - रु. १८०००/-

**३) Noise Play 2 Sports Action Camera :-**

हा ॲक्शन कॅमेरा टचस्क्रीन असून ह्या कॅमेऱ्याने दिवसाच्या उजेडात चांगले फोटो आणि व्हिडिओ काढता येतात. ह्यामध्ये 24 FPS ने 4K व्हिडिओ रेकॉर्ड करता येतात. ह्या कॅमेऱ्यामध्ये १६ मेगापिक्सेल CMOS सेन्सर आणि इलेक्ट्रॉनिक इमेज स्टॅबिलायझर दिले गेले आहे.

Time Lapse, Slo-Mo चे आणि Single Shoot ने व्हिडिओ रेकॉर्डिंग करता येते. ह्या




कॅमेऱ्याबरोबर अन्य कुठलीही Accessory दिली जात नाही, पण ह्यासाठी लागणाऱ्या Accessories बाजारात स्वतंत्रपणे उपलब्ध आहेत. हा कॅमेरा वॉटरप्रूफ नसून अतिरिक्त accessories वापरून तो ३० मीटरपर्यंत पाण्याखाली वापरता येऊ शकतो.

किंमत अंदाजे - रु. ९०००/-

**४) Yi 4K Action Camera**

Xiaomi कंपनीच्या Yi4K Action टचस्क्रीन Camera ने ३० FPS ने साधारण २ तासांपर्यंत 4K व्हिडिओ शूट करता येतात. फोटोसाठी १२ मेगापिक्सेल कॅमेरा दिला गेला आहे. कॅमेरा एक्स्ट्रा accessory वापरून पाण्याखाली वापरता येऊ शकतो. ह्या कॅमेरामध्ये GPS ची सोय उपलब्ध नाही. YI ॲक्शन ॲप वापरून ह्या कॅमेऱ्यामधील फोटो आणि व्हिडिओ एडिट करता येतात. हा कॅमेरा व्हॉइस कमांडने वापरता येत नाही. कॅमेऱ्यामध्ये फोटोज Raw Format मध्ये स्टोअर करून नंतर प्रोसेस करण्याची सोईची सुद्धा उणीव जाणवते. ह्या कॅमेऱ्याने You Tube आणि Facebook वर लाइव्ह स्ट्रीमिंग करता येते.



किंमत अंदाजे रु.१५०००/-

# ये रे ये रे पैशा

वैशाली वर्णेकर
मो. : ९८२२३ ४३००२

पैसा, पैसा, पैसा... सगळीकडे आहे हा पैसा. एखाद्या वेळी तुमच्या पाकिटात नसला तरी मनात, डोक्यात नक्कीच आहे हा पैसा.

प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आणि अर्थातच स्वत:चा असा एक भाग म्हणजेच पैसा. या पैशामध्ये इतकी प्रचंड शक्ती आहे की, तो सगळ्याचे लक्ष स्वत:कडे वेधून घेतो.

मित्रांनो, खरं म्हणजे प्रत्येक माणसाला असं वाटत असतं की- आपलं आयुष्य श्रीमंत, संपन्न आणि भरभराटीचं असावं. परमेश्वरालासुद्धा आपण बनवलेला. प्रत्येक चराचर हा समृद्ध, सुबत्तेचं आयुष्य जगावं, असं वाटत असतं. पण होतं काय की- आपले मित्र या समृद्धीकडे जाण्याचा मार्ग कुठे तरी चुकतात. आणि मग म्हणायला लागतात- छे!, छे! जास्तीचा पैसा, नको रे बाबा! आहे तेवढं पुरे आहे मला जगायला! पैसा नं फार वाईट! जास्तीचा झाला की, सगळी शांतता निघून जाते.

का असा विचार करतो सर्वसामान्य माणूस ? कारण त्याच्या डोक्यात पैशाविषयी इतकी चुकीची कल्पना भरलेली असते की, पैसा कमवायची संधी जरी आली तरी केवळ अज्ञानामुळे आणि पैसा है सुखाचं साधन आहे पण सुख नाही, असं समजून माणूस आलेली संधी घालवत असतो.

आपलं आयुष्य अतिशय कष्टात काढलेल्यांच्या अनेक गोष्टी आपल्याला माहीत असतात. ते अगदी कष्टप्रद काटकसरीचं जीवन जगतात, करोडो रुपये कमवतात आणि एका दिवशी समाजोपयोगी ठिकाणी देऊन मोकळे होतात. तसंच अतिशय मरळमार्गी असणारे लोक कधी कधी शेवटी गुन्हेगार बनतात; पैशासाठी जवळच्यांना फसवतात, भांडतात किंवा चक्क मारतातसुद्धा.

काही जण अक्षरश: एका दिवसात लाखो रुपये कमवतात, तर काही जण एका दिवसात लाखो रुपयांचा एक रुपया करतात.

बघा बरं, जरा विचार करून-



किती महत्त्वाचा आहे हा पैसा? किती जण पैशाच्या आपल्या आयुष्यातल्या स्थानाचा, महत्त्वाचा विचार करतात. कारण खरं म्हणाल तर, पैसा हा आयुष्यात अतिशय महत्त्वाचा भाग आहे. त्याच्याशिवाय जीवन जगताच येत नाही. ज्याप्रमाणे रक्ताभिसरणामुळे आपलं शरीर स्वस्थ आणि निरोगी राहतं, त्याचप्रमाणे पैशामुळे आपलं आयुष्य स्वस्थ व सुरळीत रहातं.

मित्रांनो, आता तरी उठा, जागे व्हा! नकारार्थी विचार सोडून द्या, पैशांची गुपिते शोधा. द्रव्याला, समृद्धीला हाक मारा! आपल्या आयुष्यात डोकवा. फार छोट्या छोट्या गोष्टी असतात, त्यातल्या काही काही आपण लहानपणापासून ऐकत असतो. पण उपयोगात आणत नाही. 'तथास्तु' हा असाच एक शक्तिशाली, बलशाली शब्द. आपल्या मनातली प्रत्येक बोललेली, उच्चरलेली गोष्ट प्रत्यक्षात सत्यात आणवणारा हा एक शब्द.

या तथास्तुला राजा, श्रीमंत, गरीब हे कधीच कळत नसते; ओळखता येत नसते. आपण तोंडातून एखादा शब्द काढला की, ही देवता तथास्तु म्हणून मोकळी होते.

ज्ञानेश्वरांनी पसायदानात म्हटल्याप्रमाणे 'जो जे वांछील तो ते लाहो प्राणिजात!' याचाच अर्थ जो विचार कराल, जे हवे आहे तेच मिळेल. आपल्या आजूबाजूला यश-अपयशाची अनेक उदाहरणे बघितलीत तर असं लक्षात येते की यश-अपयश हे प्रत्येक व्यक्तीच्या विचारांवर अवलंबून असतं.

आपल्याकडे उपनिषदांमध्ये अक्षय पात्राचा जो उल्लेख केला गेला, ते हे अक्षय पात्र म्हणजेच आपला मेंदू या मेंदूचा उपयोग करून जो जसा विचार करेल तसेच त्याला मिळत राहील. कारण लक्ष्मी आणि वास्तू या दोन्ही देवता सतत तथास्तु तथास्तु म्हणत असतात आणि आपण सतत चुकीच्या प्रार्थना, चुकीच्या इच्छा तोंडानी बोलत राहतो. देवता, विश्व, तथास्तु म्हणतात; मग गोष्टी चुकीच्याच घडायला लागतात. अर्थातच पैसा, लक्ष्मी आपल्यापासून दूर पळायला लागते.

मंडळी, लक्ष्मीचा फोटो पाहिला की किती प्रसन्न, छान वाटतं! लक्ष्मी कधी फाटलेली साडी, थकलेला चेहरा, दागिन्यांविरहित असते का हो? नाही ना? कधीच नाही. कारण लक्ष्मी ही फाटकी कधीच नसते. मग लक्ष्मी डोळ्यांसमोर असतानासुद्धा, तिच्याकडे पाहूनही आपण

पैशाविषयी कमीपणानी का विचार करतो? सुंदर लक्ष्मीचा, श्रीमंत लक्ष्मीचा मुखडा पाहूनही का आपण चुकीचे बोलत राहतो? चुकीच्या मागण्या करत राहतो?

देवासमोर, लक्ष्मीसमोर उभे राहिले की- हे द्या, ते द्या- अशा मागण्या करताना, आपण काहीच न करता लक्ष्मीनं मात्र आपल्या घरी पाणी भरावं, अशीच चुकीची अपेक्षा का करतो?

अशी चुकीची अपेक्षा करण्यापेक्षा हे सगळं मिळवण्यासाठी सकारात्मक- चांगली बुद्धी, चांगले गुण, उत्तम विचारधारा मला द्या- अशी मागणी आपण केली तर? मुलांना सगळं सांगताना आपण स्वत: प्रत्यक्षात करतो का?

एक छोटंसं उदाहरण. कोणी आपल्याला विचारतं- काय धंदापाणी कसा काय चाललाय? आपला धंदा, व्यवसाय खरं म्हणजे उत्तम, चांगला चाललेला असतो; पण बाकी सगळे म्हणतात म्हणून- आपणही म्हणतो, छे, छे कसलं काय- मंदी आहे झालं.

तसंच दुसरं उदाहरण. आपलं छान भरलेलं घर असतं. म्हणीप्रमाणे, खरंच लक्ष्मी पाणी भरत असते. तरी पण आपल्याकडे कोणी आलं की आपण म्हणतो, या या, आमच्या गरिबाच्या घरचा आस्वाद घ्यायला.... झालं! आधी सांगितल्याप्रमाणे वास्तू आणि लक्ष्मी सतत तथास्तु म्हणत असतात. चांगलं चालत आलेल्या धंद्याला खरंच मंदी येते आणि चांगलं खातं-पितं घर गरिबाचं व्हायला लागतं.

हा असतो तथास्तुचा परिणाम. अशा अनेक छोट्या-छोट्या गोष्टी असतात की, ज्यामुळे आपण पैशाला आपल्यापासून दूर लोटत असतो. पैशाविषयी नकारार्थी विचार आपण आधी करतो. आपली समजूत असते- जास्त कष्ट, जास्त पैसा. कष्टाशिवाय पैसा मिळत नाही. जे चुकीच्या मार्गांनी पैसा मिळवतात, त्यांच्याकडे तो कसा काय जातो? हे असं उलटं का घडतंय? भारतासारख्या समृद्ध देशात गरिबी का वाढलीय? उद्योग चालत नाहीये, पैसा अडकलाय, स्थावर मालमत्तेची कटकट, पैसे संपलेत, गुंतवणूक होत नाही असे किती तरी प्रश्नांवर प्रश्न; पण उत्तरं सापडत नाहीयेत?

बाजारात टी व्ही., फ्रीज, गाडी, टेप खरेदीला जातो; तेव्हा वस्तू कशी वापरावी याच माहितीपत्रक मिळतं. मग वर्षानुवर्षे पैसा वापरत असून तो वापरावा कसा, याचं माहितीपत्रक कुठे आणि कसे आहे?

मित्रांनो, पैशाविषयी, लक्ष्मी- विषयी विचार करण्याची वेळ आता आली आहे. पैशाशी मैत्री आपण करू शकतो, याची मजा वाटली नं?


# सप्तशती ज्वेलर्स



डोंबिवलीमध्ये सोन्या-चांदीची सुमारे ५०० दुकाने आहेत, त्यात आपल्या समाजबांधवांपैकी फक्त चारच आहोत. सप्तशती ज्वेलर्स हे त्यापैकी एक...

**कृपया आपले नातेवाईक व मित्रपरिवार यांना आपल्या दुकानाचे नाव जरूर सुचवावे. आपल्याला सोने, चांदी, रत्नाप्रित्यर्थ काही माहिती हवी असल्यास कृपया फोन करावा अथवा समक्ष भेटावे. हिरे व नवग्रहाचे खडे पारखण्याचे वैज्ञानिक प्रशिक्षण आम्ही घेतलेले असल्यामुळे रत्नांची खरेदी करताना आमच्या ज्ञानाचा आपणाला अवश्य फायदा होईल.**

**रिकरिंग डिपॉझिट (भिशी) अंतर्गत आणि मर्यादित चेन, पाटल्या, बांगड्या, वेडिंग रिंग व मंगळसूत्र यावर मजुरी आकरली जात नाही. दरमहा किमान रुपये ५०० वा अधिक रक्कम ठेवल्यास दोन वर्षांनंतर चार हप्ते जास्त दिले जातात. जुने सोने व चांदी योग्य भावात विकत घेतो.**

***व्यवसाय करणाऱ्या आपल्या समाजबांधवांना यथायोग्य सहकार्य करण्याची आपली परंपरा आहेच, त्या परंपरेचा आम्ही नम्रपणे आदर करतो.***



दुकान नं. ५०७, तळमजला, बी/३ विंग, कस्तुरी प्लाझा सोसायटी, मानपाडा पथ, डोंबिवली पू. ४२१ ०२०१.



# त्रैलोक्यपावन विठ्ठलनाम


योगिता सातवळेकर
मो. ७२७६७०३६६५

ज्याप्रमाणे ग्रीष्माच्या उन्हाचा दाह वर्षाऋतू शमवतो आणि सृष्टीला आनंद देतो, त्याचप्रमाणे मानवी मनाचा दाह कमी करते ते विठूमाऊलीचं गोड नाम. विठ्ठलाला उराउरी भेटण्यासाठी ज्ञानोबा-तुकोबांच्या पालख्यांसह हजारो वारकरी पायी-पायी पंढरपूरकडे प्रयाण करतात. ही वारीची परंपरा खूप जुनी; मात्र ज्ञानोबा-तुकोबांच्या पालख्या नेणं, ही परंपरा मात्र गेल्या १५० वर्षांतली. पूर्वी हैबतबाबा आरफळकर हे त्यांच्या पागोट्यात ज्ञानेश्वरमहाराजांच्या पादुका बांधून नेत असत. त्यानंतर 'शितोळे सरकार'नं पालखीची व्यवस्था केली. अशी ही वारी मराठी मनांना युगानुयुगे बांधून ठेवणारा एक पक्का धागा आहे. कारण देशात असो अथवा विदेशात; विठ्ठनामाचा गजर ऐकून एखाद्याचा गहिवर दाटून आला नाही, तरच नवल.

श्रीमद्आद्यशंकराचार्यांनी त्यांच्या पांडुरंगाष्टकम् या स्तोत्रात

**महायोगपीठे तटे भीमरथ्याम् वरं पुंडरीकाय दातुं मुनीन्द्रैः ।**
**समागत्य तिष्टन्तमानन्दकन्दम् परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरङ्गम् ।।**

असं पांडुरंगाचं वर्णन केलेलं आहे. शंकराचार्यांचा काळ हा आठव्या शतकातला मानला जातो. यावरून सहजच हे समजतं की, तब्बल १२०० वर्षे विठ्ठल आपल्या मनावर अधिराज्य गाजवत आहे आणि याच कारणामुळं देशी-विदेशी संशोधकांचा 'विठ्ठल व पंढरपूर' हा आवडीचा विषय राहिला आहे. या विठ्ठलाच्या स्थापनेचे अनेक पुरावे साहित्यात, शिलालेखांत सापडतात. त्यापैकी सर्वांत जुना शिलालेख शके ११५९ चा (इसवी सन १२३७) आहे. हा शिलालेख पंढरपुरात सापडला. यापूर्वीचा शिलालेख अथवा ताम्रपट आज उपलब्ध नाही. शके ११५९ च्या आधीचा एक शिलालेख पंढरपुरात पश्चिमद्वारा बाहेर आहे. त्यामध्ये विठ्ठलाचा उल्लेख आहे. या शिलालेखात 'विठ्ठल' देवू 'नायक' याने 'लान मडू' लहान मठ) मोडू नये, यासाठी विठ्ठलाची आण घातली आहे. हा शिलालेख शके ११११ चा इसवी सन ११८९) आहे. यापूर्वी इसवी सन ११६८ पर्यंत विष्णुभक्त समजल्या जाणाऱ्या चालुक्यवंशीय राजांचे पंढरपुरात



राज्य होते; परंतु त्यांनी विठ्ठलाचा कुठेच उल्लेख केलेला दिसत नाही. त्यामुळं असं मानलं जातं की, बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात ११६८ ते ११८५ च्या सुमारास विठ्ठलाची स्थापना झाली असावी.

साहित्यात पाहता पद्मपुराण, स्कंदपुराण यांत विठ्ठलाचं पंढरपुरात का येणं झालं, याविषयीच्या कथा येतात. रागावलेल्या रुक्मिणीचा रुसवा काढण्यासाठी, पुंडलीकभेटीसाठी, मल्लिकार्जुनाचे रूप घेऊन डिंडिरवाचा वध करण्यासाठी कृष्ण हा विठ्ठलस्वरूपात पंढरपुरी आला, अशा आख्यायिका आहेत. यापैकी निश्चित कारणापर्यंत पोचणे शक्य नसलं तरी इतिहासतज्ज्ञ ग. ह. खरे यांच्या मतानुसार, होयसळ राजा विष्णुवर्धनानं पंढरपुरातील देऊळ बांधले असावे. अशा या विठ्ठलाला कुणी विठोबा म्हणतं, कुणी विठू, कुणी पांडुरंग, कुणी केशव, तर कुणी केशवराज म्हणतं. पैकी पांडुरंग हे विठ्ठलाचं 'क्षेत्रनाम' आहे व त्याची व्युत्पत्ती 'पंडरगे' या पंढरपूरच्या पूर्वीच्या नावात आहे. विठ्ठल/ विठोबा या नावाची व्युपत्ती अनेकांनी अनेक प्रकारांनी दिलेली आहे. 'विदि ज्ञाने स्थल:/ स्थिर:' अर्थात् ज्ञानाच्या ठिकाणी असणारा तो विठ्ठल होय, असं एक मत आहे. डॉ. रा. गो. भांडारकरांनी मूळ 'विष्णू'पासून व्युत्पन्न अशा 'बिट्टी' या कन्नड शब्दात विठ्ठल शब्दाचं मूळ मानलं आहे. असेच काहीसे मत 'शब्दमणिदर्पण' या ग्रंथाच्या 'अपभ्रंशप्रकरणा'त येतं. तिथं त्यांनी 'विट्टु'ला 'त' हा प्रेमवाचक प्रत्यय लावून हे विठ्ठलरूप साधलं आहे. कुणी 'वी'चा केला 'ठोबा' यावरून त्याला ज्ञानमूर्ती असं संबोधलं आहे. काहींच्या मतानुसार, विठ्ठल या नावाचं विटेशी साधर्म्य आहे. अशा प्रकारच्या अनेक व्युत्पत्ती जरी असल्या तरी विठ्ठलभक्तांनी, त्यांना त्यांचा देव जसा भावला तसा त्याच्या नावाचा अर्थ केला आहे. उदाहरणार्थ-

**विकारी विधाता जाण ।**
**ठकारी नीलकण्ठ आपण ।**
**लकारी लक्ष्मीनारायण ।**
**त्रैलोक्यपावन विठ्ठलनाम ।।**

यासारख्या वचनांवरून असं जाणवतं, की विठ्ठलामध्ये केवळ विष्णुतत्त्वाचा वास नसून, तिन्ही देवांचा समन्वय आहे; तसंच विठ्ठलाचं हे रूप विठ्ठलाच्या स्थापनेच्या वेळी प्रस्थापित अशा व स्व-स्व-संप्रदायांची परिसीमा गाठलेल्या जैन, शैव, वैष्णव व लिंगायत या पंथांचाही महासमन्वय आहे. हा महासमन्वय विठ्ठलाच्या मूर्तीतही दिसतो, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. मत्स्याकार कुंडलांपासून कौस्तुभमण्याचा हार, श्रीवत्साचन-श्रीनिकेतनाच्या खुणा असणाऱ्या विठ्ठलमूर्तीच्या डोक्यावरील किरिट हे काहींच्या मते शिवलिंग आहे; तसंच विठ्ठलाचे पाय व पावलं ही एकमेकांना अगदी समांतर आहेत. त्याचप्रमाणे विठ्ठलाला लावल्या जाणाऱ्या गंधातही समन्वय दिसतो. शैव लोक कपाळावर आडवं गंध लावतात, तर वैष्णवपंथी उभं गंध लावतात; विठ्ठलाला मात्र गोलाकार चंदन लावलं जातं.

संत-महंतांपासून तंतकवींपर्यंत व साक्षात् ज्ञानेश्वरमहाराजांपासून ते आजच्या देशी-विदेशी संशोधकांपर्यंत अनेकांना विठ्ठलानं आकर्षून घेतलं आहे. वेगवेगळे संदर्भ पाहताना वेगवेगळ्या दृष्टिकोनांमधून विठ्ठलाला अनुभवताना विठ्ठलातील 'समन्वय' या धाग्यापर्यंत आपण पोचतो. विठ्ठल ही केवळ देवता नसून, ते एक तत्त्व आहे व त्या तत्त्वाची प्रचीती घेणं गरजेचं आहे, हे लक्षात येतं. विठ्ठलाच्या ठायी केवळ तत्कालीन प्रस्थापित पंथांचा समन्वय आहे असं नाही, तर पौर्वात्य व पाश्चिमात्य विचारांचाही समन्वय आहे आणि त्याचं बोलकं उदाहरण म्हणजे ख्रिश्चन मिशनरी जस्टिस एडवर्ड ॲबट. (ज्यांनी कट्टर ख्रिश्चन असूनही, मराठी संतवाङ्मयाचा व विठ्ठलाचा अभ्यास केल्यानंतर, आपल्याकडून हिंदू धर्माची जी निंदा झाली, त्याबद्दल माफी मागून, मृत्यूनंतर आपल्या पार्थिवाचं हिंदू धर्माप्रमाणे दहन करावं, असं सांगितलं होतं). याशिवाय प्राध्यापक रिसाइड, फादर डलरी, डॉ. गुंथर सोंथायमर, प्रा. रेमंडक्रोव्ह आदी अनेक विदेशी संशोधकांनीसुद्धा या विठ्ठलतत्त्वाचा अभ्यास केला आहे.

सामान्य वारकऱ्यापासून ते विदेशी संशोधकांपर्यंत सर्वांना भारावून टाकणारं, त्यांच्या आचार-विचारांमध्ये बदल घडवणारं विठ्ठल हे एक तत्त्व आहे; म्हणूनच डॉ. रा. चिं. ढेरे म्हणतात ते पटतं. ते म्हणतात : 'श्रीविठ्ठल : एक महासमन्वय' आहे; अनेक विचारांचा आणि अनेक भावनांचा.

# भांडण

प्रदीप पु. सातवळेकर, मुलुंड(पूर्व)
मो. : ८३६९१ ९५०६९

एक होता आचारी
एक होता पुजारी
भांडण झाले दोघांचे
यजमानांच्या दारी

आचारी बोले पुजाऱ्याला
कोणत्याही समारंभाला
आमंत्रित जे येतात
माझे भोजन चाखायला

उत्तम मेनू मी करी
सर्व त्यावर ताव मारी
यजमानास धन्यता देत
तृप्त होऊन जाई घरी

अन्नदान मी करी
कोणता धर्म या उपरी
उगाच कशाला भाव
मारतोस तू रे पुजारी?

पुजाऱ्याला महत्त्व नसे रे
सर्वाआधी पोटोबा असे रे
संस्कृतचे तुझे मंत्र
कोण ऐकत बसतो रे?

पुजारी बोले आचार्याला
माझ्या इशाऱ्याने चाले सोहळा
मी सांगेन ती पूर्वदिशा
खूप मान असे मजला

माझ्याकडे लक्ष सर्वांचे
भटारखान्यात कोण डोकावे ?
मी सांगेन तसे तू वागावे
तेल, तूप, भांडी द्यावे

मी सर्वांवर राज्य करी
कोण तुझ्याशी बोलतो तरी ?
तुझ्याजवळ वाढपी ताफा
मी एकटा सर्व पूजा करी

मी सर्व फोटोत दिसे
कुणी तुझ्या मागे नसे
आचारी होणे सोपे रे
पुजारी होणे कठीण असे

दोघांची ही हमरी-तुमरी
ऐकी यजमानीणबाई
चटकन पुढे येत म्हणे
कां भांडता भाई भाई?

रुपायाच्या दोन बाजू तुम्ही
कधी तर कधी तो वरी
अर्थशून्य भांडता तुम्ही
पैसा सर्व काम करी

कसले दान, कसले मंत्र
पैसा आहे खरा तंत्र
तुमच्या दोघांच्या भेटीत
पैसा आहे खरे सूत्र

आचारी, दूध उतू गेले रे
भटारखान्यात धाव रे
पुजारी, मंगलाष्टकं सांग रे
मुहूर्त जवळ आला रे !

# रक्तदान श्रेष्ठ दान

सौ मोहना पळसुले
मो. ९४२२५ १३०६३

एके दिवशी सकाळी सहा वाजता फोनची रिंग किणकिणली. पलीकडून थोडा चिंतेचा सूर आला आणि पॉझिटिव्ह रक्तगट असलेल्या रक्तदात्यांची विचारणा झाली मी तत्परतेने यादी पाहून काही लोकांचे दूरध्वनी क्रमांक कळविले. ही गोष्ट माझ्या दैनंदिन कामात विसरूनही गेले होते. चार दिवसांनी पुन्हा सकाळी त्याच व्यक्तीचा फोन आला. पलीकडून बोलणाऱ्या व्यक्तीच्या आवाजात आनंद होता, कृतज्ञता होती. कळविलेल्या यादीतील दोन लोकांनी संबंधित रुग्णाला त्याच्या गरजेनुसार रक्तदान केले होते. आभाराचा फोन संपला आणि मन विचारांत गढून केले. मनातून खूप समाधान आनंद, शांतता वाटत होती. एका कुटुंबाला झालेली मदत मला मात्र बरंच काही देऊन गेली होती.

'गरज ही शोधाची जननी असते.' या उक्तीप्रमाणे आम्हा पळसुले कुटुंबाच्या आयुष्यात उद्‌भवलेल्या अडचणीतून चांगाले काम करावयाची प्रेरणा मिळली होती. माझ्या सासूबाई कै. कुमुद ऊर्फ गंगूताई पळसुले यांना ऑगस्ट १९९२ मध्ये रक्ताचा कन्सर उद्भवला आणि सुरू झाली जीवघेणी शर्यत. आम्हा सर्व कुटुंबीयांवर जपलेल्या संकटाचा स्वीकार आणि सामना करता-करता महिना-दोन-महिन्याच्या कालावधीतच सासूबाईंना देवाज्ञा आली. त्यांचा रक्तगट ओ निगेटिव्ह असल्यामुळे महिनाभरात रक्तदाते मिळवताना आम्हा कुटुंबियांची दमछाक झाली होती. या काळात आम्ही अनेकदा हतबलता अनुभवली होती.

पुढे बरीच वर्षे आम्हा कुटुंबीयांमध्ये याबाबत काय करता येईल याची चर्चा होत होती. पण नेमकं काय करावं, ते कळत नव्हतं. सन २००३ मध्ये माझे दीर श्री. प्रमोद पळसुले यांच्या कल्पनेतून आईच्या व आजी कै. शांताबाई गोखले यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिराचे आयोजन करावयाचे ठरले. लगोलग सर्व कुटुंबीय कामाला लागलो. जनकल्याण रक्तपेढीशी संपर्क माधून कार्याचा श्री गणेशा झाला. जनकल्याण रक्तपेढीने संपूर्ण सहकार्य करावयाची तयारी दर्शविली. आम्हा कुटुंबीयांनी आपल्या संपर्कातील नातेवाईक, मित्रमंडळ, स्नेही, सहकारी यांचेपर्यंत सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर करून शिबीराची माहिती पोहोचवली. प्रथम वर्षी अपेक्षित प्रतिसाद लाभला नाही. पण आता माघार घ्यायची नाही, हा पण करून आम्ही प्रत्येक वर्षी नेटाने जुलै महिन्याच्या एका रविवारी रक्तदान शिबिर आयोजित करू लागलो.

शिबिरामध्ये उपस्थित असणाऱ्या लोकांची जन्मतारीख, ई-मेल, रक्तगट इ. माहिती गोळा करून संकलित करू लागलो. रक्तदात्यांना त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा देऊन त्यांच्या संपर्कात राहू लागलो. शिबिराच्या आधी साधारण एक महिना लोकांना ई-मेलद्वारे शिबिराची माहिती कळवतो. त्यामुळे रक्तदाते वेळ राखून ठेवू शकतात. शिबिराच्या आधी त्यांना स्मरणात राहण्यासाठी मेसेज पाठवू लागलो. या




कामामध्ये फेसबुक आणि व्हाटसअॅप सारख्या सोशल मीडियाचा प्रभावी उपयोग होतो, हे विशेष नमूद करावेसे वाटते. हळूहळू या शिबिराची आमच्या संपर्कातील लोकांना सवय होऊ लागली त्यांचाही उत्साह दुणावला. त्यांच्याकडून आपणहून शिबिरासंबंधीची विचारणा होऊ लागली आणि आज या कार्याला जवळजवळ १६ वय पूर्ण झाली आहेत.

अजूनही समाजामध्ये रक्तदानाविषयी गैरसमज, भय आहे. त्याचा परिणाम जाणवल्याशिवाय राहात नाही. कारण शिबिर आयोजित केल्यानंतर त्याची माहिती संपर्कातील १००० पेक्षा जास्त लोकांपर्यंत पोहोचवतो, तेव्हा २५ टक्के लोक प्रत्यक्ष रक्तदानाला हजर असतात. यापैकी अनेक लोक इच्छा असूनही डायबिटीस, थायरॉईड, मधुमेह, अॅनिमिया, दंतचिकित्सा यासारख्या आजाराने त्रस्त असल्यामुळे रक्तदान करू शकत नाहीत. अॅनिमियाचे प्रमाण हे स्त्रियांमध्ये अतिशय मोठ्या प्रमाणावर असल्याचे निदर्शनास आले आहे, तर अतिशय लहान वयातील तरुण पिढी मधुमेह, उच्च रक्तदाब यासारख्या विकारांची बळी ठरत आहे. तरीदेखील पं. रामदास पळसुले यांच्या संपर्कातून मोठ्या संख्येने रक्तदाते

शिबिराला हजेरी लावत असतात. यातूनच गेली पाच वर्षे शिबिरातील रक्तदात्यांची संख्या १००पेक्षा अधिक होत आहे. जुलै २०१९च्या शिबिरामध्ये ११४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शिबिराच्या माध्यमातून ज्यांना रक्तदान करावयाची इच्छा आहे, त्यांना समुपदेशन तसेच शंकानिरसन केले जाते. रक्तपेढीचे कामकाज नेमके कसे चालते, हे प्रत्यक्ष बघण्याची सोय जनकल्याण रक्तपेढी करत असते. सबब, जास्तीत जास्त लोकांनी या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी व्हावे, असे मी आवाहन करते.

हे सगळे करत असताना, आम्हा कुटुंबीयांचा अजून एक हेतू असतो की, पर्यावरणाचे रक्षण व्हावे. त्या दृष्टिकोनातून आम्ही शिबिरासाठी लागणाऱ्या साहित्यामध्ये इको-फ्रेंडली वस्तूंचा वापर करतो. यामध्ये प्रामुख्याने प्लॅस्टिक पेपर. पिशव्या, डिशेश यांचा वापर टाळतो. आलेल्या रक्तदात्यांना कापडी पिशवीचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी प्रवृत्त करतो. रोपटे देऊन 'झाडे जगवा-झाडे वाचवा' हा संदेश समाजापर्यंत



पोहोचविण्याचा प्रयत्न करतो.

पळसुले परिवारासोबत रक्तदान शिबिर आयोजनात अळवणी, नवाथे, पेठे परिवाराचा सक्रिय सहभाग असतो आमचा परिवार शिबिर आयोजित करून थांबत नाही, तर प्रत्येक वर्षी रक्तदानात पण मोठ्या संख्येने प्रत्यक्ष सहभाग नोंदवलेला आहे. यामध्ये देवल, जोगळेकर, ओक आणि पंडित परिवाराचा सक्रिय सहभाग असतो श्री. प्रमोद व शाम पळसुले यांनी शंभरपेक्षा अधिक वेळा रक्तदान केले आहे. आम्ही इतर कुटुंबीयदेखील रक्तदान करतो. आमची पुढची पिढीसुद्धा नव्यानं या परिवारात दाखल होत आहे, ही आमच्यासाठी अजून एक समाधानाची गोष्ट आहे. रक्तदान शिबीराचे लावलेले छोटेसे रोपटे आज झपाट्याने वाढताना बघून मानसिक समाधान तर मिळतेच, पण समाजाचे ऋण म्हणून कृतज्ञताही व्यक्त होत आहे.




# पाणी फाउंडेशन सामाजिक काम

प्रभाकर करंबेळकर
मो.नं. ९८९०६ ०७१३२

मकरसंक्रांत झाली की सूर्य तिळातिळाने प्रखर होऊ लागतो, तशी होलिकोत्सवाची हाळी साद घालू लागते. जागोजागी होळी पेटते आणि वातावरणातील उष्मा जास्तच वाढीला लागतो. त्या उष्म्यापासून काही काळ सुटका होते ती वसंत ऋतूच्या आगमनाने आणि त्याबरोबरच कानांवर पडणाऱ्या सुरेल कोकिळकूजनाने. पाहता-पाहता शाळांच्या परीक्षांचा हंगाम संपतो तशी बाजारात रत्नागिरीच्या हापूस, पायरी आंब्यांची जोमदार आवक सुरू होते अन् उन्हाळ्याची काहिली कमी झाल्यासारखी वाटू लागते. पण प्रत्यक्षात मात्र उन्हाळा वाढतच असतो आणि दिवसेंदिवस धरणातील, खेडेगावांतील विहिरींतील पाण्याची पातळी खाली-खाली जाऊ लागते. गावोगाव पाणीवाटपासाठी टँकर्सच्या खेपा सुरू होतात आणि आपल्यासारखी शहरात राहणारी मंडळी वर्तमानपत्रात पाण्याच्या दुर्भिक्षाच्या बातम्या वाचून हळहळू लागतात. हे पाण्याचे दुर्भिक्ष कायमस्वरूपी संपावे असे मनोमन वाटत राहते; पण त्यासाठी मी नक्की काय करायचे याचा विचार, माझ्या घरात नळाला येणाऱ्या पाण्याखाली बदली भरत लावली की, संपून जातो.

दुसऱ्या दिवशी पाण्यासंदर्भात बातम्या वाचल्या की, कालचाच विचार परत उफाळून येतो आणि आता मी काही तरी करायलाच हवे, असे मी ठरवू लागतो. पण नक्की काय करायला हवे याचा विचार पक्का व्हावा, यासाठी पाणी फाउंडेशन ही २०१६ मध्ये ना-नफा तत्त्वावर स्थापन झालेली संस्था पुढे आली. ग्रामीण महाराष्ट्रातील जनतेला पाण्याच्या तीव्र दुष्काळाशी सामना करता यावा, यासाठी 'सत्यमेव जयते' ह्या टीव्ही मालिकेच्या टीमने पुढाकार घेतला. पाण्याचा तुटवडा हे मानवनिर्मित संकट आहे, त्यामुळे या संकटातून बाहेर येण्यासाठी लोकांनीच प्रयत्न करायला हवेत, असं त्यांना वाटलं; म्हणूनच या दुष्काळाला पळवून लावण्यासाठी ह्या मोहिमेत लोकांना सहभागी करून घेणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि प्रशिक्षित करण्यासाठी संवादाचे माध्यम पुरवणे, हे पाणी फाउंडेशनने लक्ष्य ठरविले आहे. पाणी फाउंडेशन सध्या जलसंधारण (शास्त्रशुद्ध पाणलोट व्यवस्थापन), नेतृत्वगुण आणि समाजबांधणी/संघटन या विषयांबाबत प्रशिक्षण देत आहे. महाराष्ट्रातील जवळपास ९०% दुष्काळी भागात पाणी फाउंडेशनचे काम सुरू आहे. प्रशिक्षणात पाणलोट व्यवस्थापनाविषयी शिकलेली



कौशल्ये प्रत्यक्षात आणण्यासाठी गावकऱ्यांना दिलेली प्रेरणा म्हणून २०१६ या वर्षी 'सत्यमेव जयते वॉटर कप' या अनोख्या स्पर्धेची निर्मिती झाली. २०१९ या वर्षातली वॉटर कप स्पर्धा ८ एप्रिल ते २७ मे या कालावधीत घेण्यात आली. १ मे रोजी पाणी फाउंडेशनतर्फे आयोजित केलेल्या महाश्रमदान कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात शहरांतील जलमित्र सहभागी झाले. संपूर्ण राज्यभरात पाणलोट व्यवस्थापन संरचना उभारण्यासाठी गावकरी आणि शहरी नागरिक त्या दिवशी एकत्र आले.

याच मोहिमेचा भाग म्हणून आपल्या कऱ्हाडा युथ क्लबच्या सभासदांनी आपलाही सहभाग देण्याचे ठरविले. त्याला कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे यांनी प्रोत्साहन दिले आणि त्यानुसार पाणी फाउंडेशनला कळविले. कऱ्हाडा युथ क्लबने आपल्या सभासदांना १ मे २०१९ रोजीच्या महाश्रमदानात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले. आमंत्रण प्राप्त झाल्यावर कोण कोण श्रमदानासाठी येणार, असे आवाहन करताच कऱ्हाडे ब्राह्मण बेनेवोल्ट फाउंडेशनच्या सभासदांनी देखील सहभाग घेण्याचे ठरविले आणि बघता-बघता ३० जण तयार झाले,फ त्यापैकी २४ जण नक्की झाले व त्यांची यादी तयार झाली आणि १ मे रोजी कसे जायचे, बरोबर काय काय न्यायचे, किती वाजता निघायचे इ.ची जुळवाजुळव माननीय सर्वश्री लक्ष्मीकांत देसाई, मकरंद फणसळकर, अमित शहाणे आणि सौ. वैशाली वेर्णेकर यांनी चार दिवस अगोदरपासूनच सुरू केली. व्हाट्सअॅपवर मेसेजची देवाणघेवाण सुरू झाली, जाण्यायेण्याचा भाडेखर्च, चहा, नाश्ता इ. चा खर्चाचा अंदाज घेऊन पैसे जमा झाले आणि पाहता-पाहता १ मे ची पहाट उजाडली. एकेका कारमध्ये चार-चार जण अशा सहा कार स्वारगेट ते कात्रज रस्त्यावरील चौकात पहाटे ५ वाजताच हजर झाल्या आणि एकत्रितरीत्या सासवडमार्गे पुरंदर रस्त्याला लागल्या. आम्हाला पुरंदर तालुक्यातील उदाची वाडी हे गाव श्रमदानासाठी देण्यात आले होते. सकाळी ६.३० वाजता आम्ही सासवड बस स्टॅण्डसमोर चहा-नाश्ता



केला आणि ठीक ७.३० वाजता गावात पोहोचलो.

गावात पोहोचलो आणि श्रमदानाच्या ठिकाणी जाण्यास निघालो तशा गावातील ४/५ सुवासिनी हातात आरतीचे तबक, तबकात हळदी/कुंकू, फुलाच्या पाकळ्या, निरांजन इ. घेऊन सामोऱ्या आल्या. त्यांनी सर्व पुरुषमंडळींना कुंकुम-तिलक लावून ओवाळले आणि सर्व महिलावर्गाला हळद,कुंकू लावून व फूलपाकळ्या टाकून ओवाळले आणि आमचे सर्वांचे स्वागत केले. नंतर आमचा सर्वांचा ताबा गावकरी स्वयंसेवकांनी घेतला व आमचे ८/८ जणांचे गट तयार करून प्रत्येक गटाकडे एक कुदळ, एक फावडे आणि दोन घमेली सुपूर्त केली. प्रत्येक गटास ज्या जागी काम करायचे, त्या जागी घेऊन गेले. ज्या ठिकाणी जलसंधारणासाठी चर खणायचा होता, त्या जागी गावकऱ्यांनी अगोदरच पांढऱ्या फक्कीने आखणी करून ठेवली होती. चर ३०' लांब x १.५' रुंद x १.५' उंच असा खणायचा होता. गावस्वयंसेवकाने प्रत्येक गटास कसे खणायचे, खणून काढलेली माती चराच्या कोणत्या बाजूस कशी टाकायची इ.चे प्रात्यक्षिक दाखविले आणि गटातील एकाने कुदळीने खणण्यास, एकाने फावड्याने माती घमेल्यात भरण्यास व भरलेले घमेले चराशेजारी रिकामे करण्यास सुरुवात झाली. साधारणपणे १०/१० मिनिटांनी खणणारा, माती भरणारा आणि घमेले रिकामे करणारे यांची गटाच्या आठ सभासदांत अदलाबदल चालू झाली. गटाच्या अथक परिश्रमातून तीन तासांत नियोजित चर खणण्याचे काम पूर्ण झाले. काम सुरू होते तेव्हा गावस्वयंसेवक मधून-मधून येत. चराच्या रुंदी आणि खोलीचे माप त्यांच्या हातातील काठीने मोजत व काही सुधारणा हवी असेल तर तसे मार्गदर्शन करीत असत. त्यामुळे सर्वच चर गावकऱ्यांना जसे हवे होते तसे तयार झाले. आपल्या सभासदांनी एकूण तीन चर खोदले.

एक वेळा पाऊस आला तर एका चरात २७०० लिटर पाणी मुरू शकते. असा त्या गावात वर्षात १० वेळा पाऊस पडला, तर २७००० लिटर पाणी एका चरातून साठू शकते. त्या दिवशी त्या एका गावात अंदाजे ३६०० कार्यकर्ते विविध शहरांतून जमा झाले होते आणि सर्वांनीच एकत्रितरीत्या चर खणणे, दगड एकावर एक रचून बंधारा तयार करणे अशी कामे केली. ३००० लोकांनी चर खणण्याचे काम केले समजले, तर अंदाजे ३७५ चर खणून झाले. गुणिले २७००० लिटर पाणी म्हणजे वर्षात त्या गावात ३७५ x२७००० लिटर = १,०१,२५००० (एक कोटी एक लाख पंचवीस हजार लिटर) पाणी जमा होण्याएवढे काम एका दिवसात झाले. याच पध्दतीने महाराष्ट्रातील सर्वच खेडेगावांत जलसंधारणाचे काम झाले, तर कोणत्याच गावकऱ्याला गावात टँकर कधी येतोय आणि मला पाणी कधी मिळतेय याची वाट पाहावी लागणार, नाही असे वाटते.



आपल्या पुणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाकडून निदान एक गाव तरी टँकरमुक्त केल्याचे समाधान मनात बाळगत आणि परतीच्या वाटेवर झालेल्या चटकदार मिसळ-पावाची चव जिभेवर घोळवत आम्ही सर्व २४ सभासद कारने पुण्याला परतलो तो एकच निश्चय मनाशी बाळगत, की- पुढील १ मे ला २४ च्या जागी २४० सभासद अशा महाश्रमदानाला घेऊन जायचे. काय, मग तयार आहात का? पुढच्या वर्षासाठी आत्ताच आपला होकार कळवाल ना?

विशेष सूचना - या वर्षी १ मे ला उपरोक्त जे काम केले, त्याची फलश्रुती काय त्याची पाहणी करायला अनंत चतुर्दशीनंतरच्या शनिवारी म्हणजे १४ सप्टेंबर २०१९ ला सर्वांनी सामूहिकरीत्या जाण्याचा विचार आहे. जे सभासद स्वखर्चाने येऊ इच्छित असतील, त्यांनी कृपया आपली नावे संघाच्या कार्यालयात फोनवर अथवा समक्ष भेट देऊन कळवावीत, ही विनंती. म्हणजे त्याप्रमाणे जाण्या/येण्याची व्यवस्था करता येईल.

# जायफळ

श्रीकृष्ण शांताराम आंबेकर
मो. :९४७९७८९४५५

आरोग्य आणि चविष्ट खजिना आहे जायफळ, जाणून घ्या. फायदे आणि नुकसान. तुम्ही तुमचे आयुष अधिक सुंदर करू इच्छिता, तर तुमच्या स्वयंपाघरातील जायफळाचर महत्त्व जाणून घ्या.

जायफळ हे फक्त स्वादासाठी नाही, तर त्याच्या औषधी गुणासाठी प्रसिद्ध आहे.

**(१)पाचन तंत्रासाठी जायफळ** - खाण्यामध्ये स्वाद व सुगंध, पाचनक्रियेला मजबूत करणे, भुक, बद्धकोष्ठ, गॅस, मुरड आदि पासून सुटका मिळते.

**(२) डोकेदुखीसाठी** - कितीही जास्त प्रमाणात डोके दुखत असल्यास आराम मिळतो, पाणी किंवा दुधात उगाळून लेप लावावा

**(३) डोळ्यासाठी**- डोळ्यासंबंधी आजार ठीक होतात. काळजी अधिक घ्यावी की, डोळ्यात जाऊ देऊ नये. बाहेर लेप लावावा.

**(४) निद्रानाशात उपयोग** - आजकाल झोप कमी, कामामुळे वेळ मिळत नाही. पूर्ण झोप नाही. डोके जड, चिडचिड, थकवा, यासाठी एक चिमूटभर जायफळ पाण्याबरोबर घ्यावे, आराम मिळेल

**नुकसान** - साधारण जायफळाचा कमी प्रमाणात उपयोग करणे ते गरम असल्याने नुकसान होईल.

औषधी गुण - उचकी, तोंड येणे, जुलाब, सर्दी, दात दुखणे इ. साठी.

**(५) त्वचेसाठी** - त्वचेला कोमलता, डोळ्याखाली काळे डाग यापासून सुटका होईल.

**(६) लहान मुलांना** - तेज बुद्धीसाठी उपयोगी आहे.

**(७) तेल** -जायफळाचं तेल संधिवाता वर उत्तम उपयोगी आहे

# रिटर्न गिफ्ट

श्री. बाळासाहेब भाटे, सातारा.
मो. : ९४२२४०२६४९

बँकींग क्षेत्रात विविध पदांवर अनेक वर्षे काम करीत असताना 'प्रेमाने जग जिंका' या गुरुमंत्राची अनुभूती मी अनुभवली. हत्ती होऊन लाकूड वाहण्यापेक्षा मुंगी होऊन साखर खावी, ही आईची शिकवण. आई ही मुलाची पहिली गुरू. ते साक्षात ज्ञानपीठ असते. आईने आमच्यावर उत्तम संस्कार केले. माझ्या आईच्या शब्दाला मांगल्याचा स्पर्श होता. वाणीतील गोडवा, तसेच शांत-प्रेमळ स्वभाव ही तिच्या व्यक्तिमत्त्वाची जमेची बाजू होती. तिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतदेखील जीवाभावाची अनेक माणसे जोडली. ती आमची आधारवड बनली. सर्वांचे प्रेमाने आदरातिथ्य करण्याचा तिचा वर्णगत स्वभाव अचंबित करणारा होता. आईची ही पुण्याई पुढे उदंडपणे आमच्या वाड्याला आली. तिने त्या वेळी जोडलेल्या कुटुंबीयांच्या ऋणानुबंधात राहण्यात आजही आम्ही धन्यता मानतो. साताराचे नावाजलेले डॉक्टर पेंढारकर कुटुंबीय हे त्यापैकी एक. सात्त्विकता, सृजनशीलता, नम्रता यांचे मूर्तिमंत प्रतिक. 'विद्या विनयेन शोभते' याचे इथे दर्शन घडते. सरस्वती आणि लक्ष्मी याचा निवास येथे पाहायला मिळतो.

नमनाला खंडीभर तेल न जाळता मी उपरोक्त विषयाच्या मांडणीच्या प्रयोजनाकडे वळतो. बँकींग क्षेत्रात अनेक वर्षे काम केल्यामुळे जनसंपर्क वाढत गेला. आईच्या शिकवणीचा जीवनात लाभ झाला. सेवानिवृत्तीनंतर विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्याची आवड निर्माण झाली. या सर्वांची परिणती म्हणजे विवाह पत्रिकांचा ओघ वाढतच गेला. आपली रक्ताची नाती तसेच जोडलेली जीवाभावाची माणसे त्याच्या आनंद सोहळ्यात आपल्याला सहभागी करून घेतात, ही वस्तुस्थिती मनाला सुखावून जाते. पंचांगातील मुहूर्त, काढीव मुहूर्त, सवडशास्त्र, शुभ दिवस, कार्यालयाची उपलब्धता, वधू-वरांची सोय यामुळे जवळजवळ वर्षभर सनई-चौघडे वाजतच असतात. ताकाला जाऊन भांडे दडविण्याचा माझा स्वभाव नाही. त्यामुळे खरे सांगतो, पत्रिका आल्यावर मी मात्र शेवटून पत्रिका वाचायला सुरवात करतो. आपली उपस्थिती हाच आहेर, कृपया पुष्पगुच्छ, आहेर स्वीकारले जाणार नाहीत, आपला आशीर्वाद हाच अनमोल आहेर- अशी मनाची उभारी वाढविणारी वजनदार वाक्ये वाचली की, मगच मी शांतपणे पत्रिकेचे प्रारंभापासून वाचन सुरु करतो. अन्यथा, अशा वाक्यांचा अभाव असणाऱ्या पत्रिका नंतर वाचू म्हणून मी त्या सोईस्कररीत्या बाजूला ठेवतो.

मंडळी, विवाहसोहळ्यात आहेर न स्वीकारण्याची मानसिकता अलीकडे वाढत चालली आहे. हा बदल निश्चितपणे स्वागतार्ह आहे. समाजात चांगल्या उपक्रमांचे, प्रथेचे अभिसरण सातत्याने होणे ही आता काळाची गरज आहे. याआधी लग्नकार्यात सर्रास बंद पाकिटे किंवा गिफ्ट बॉक्स दिले जात असत. आपण त्यांच्या प्रत्येक मंगल कार्यात अगदी घसघशीत आहेर केला आहे; मग आपल्या कार्यात आहेर द्यावा, असे त्यांना वाटणार नाही कां? आहेर स्वीकारण्यामागचे हे लॉजिक. विचारधारा मोठी गमतीशीर वाटते. मंगल कार्याच्या निमित्ताने गजबजलेले घर रिकामे झाले की, मगच आलेल्या आहेराच्या बंद पाकिटांचा समाचार घेतला जात असे. कुणी किती रकमेचा आहेर दिला यावर खमंग चर्चा रंगत जसे. बॉक्समधील वस्तू अगोदरच घरात वापरात असेल, तर त्याच बॉक्सला तेच पॅकींग नव्याने व्यवस्थित करून बॉक्स लॉफ्टवर विराजमान होत असे. कुणाच्या तरी मंगल कार्यात हाच बॉक्स आहेर म्हणून पुढे करता येईल, हा गृहलक्ष्मीचा काटकसरीचा सल्ला. कदाचित बॉक्स देणाऱ्यानेसुद्धा हाच विचार केला नसेल कशावरून? काही मंगल कार्यात अक्षतांचा वापर हा फक्त स्टेजपुरताच केल्याचे मी अनुभवले आहे. यामुळे तांदळाची अनाठायी नासाडी होत नाही. अशा प्रकारे सामाजिक जाणिवेचे भान जपणाऱ्या या मंडळींच्या प्रति असणारा आदरभाव द्विगुणित होतो. वधू-वराकडील उदयेन्मुख कवी, कवयित्री स्वरचित मंगलाष्टके याप्रसंगी तारसप्तकात म्हणत असतात. उपस्थितांना याचे काही देणे -घेणे नसते. अशी तारसप्तकातील मंगलाष्टके संपताच गुरुजी क्षणभरही वेळ न दवडता ''तदेव लग्नं सुदिनं तदेव। ताराबलं चंद्रबलं तदेव।'' सुरू करताच, हातातील अक्षता समोरच्या व्यक्तीच्या डोक्यावर टाकून भोजनकक्षाकडे धाव घेण्याची आपली मानसिकता.

या पार्श्वभूमीवर डॉ. गिरीश पेंढारकर यांची कन्या सौ. सुरभी हिच्या स्वागत समारंभाप्रसंगी आलेला एक सुखद अनुभव सर्वांनाच अंतर्मुख करायला लावणारा होता. तो आवर्जून आपण सर्वांना सांगावा म्हणून साहित्यिक दर्जा नसलेला हा बोलीभाषेतील लेखन-प्रपंच. पुष्पगुच्छ-आहेर हा विषयच नव्हता. कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ पेंढारकर कुटुंबीयांनी केलेल्या स्वागताने आम्ही भारावून गेलो. स्टेजवर डॉ. माधवराव पेंढारकर, डॉ. गिरीश पेंढारकर, डॉ. सौ. मेधा पेंढारकर, कन्या व जावई, यांची गाठ घेताना 'आनंदाचे डोही आनंद तरंग' याची अनुभूती आम्हाला आली. तो सुखद क्षण आजही माझ्या स्मृतिपटलावर टवटवीत आहे. भोजनासाठी तीन-चार सज्ज काऊंटर. कुठेही गडबड, गोंधळ नाही. त्यामुळे शाही भोजनाचा मनसोक्त आस्वाद घेता आला. भोजन कक्षावर उपस्थितांची झालेली झुंबड हा अनुभव आपल्या लेखी

(पान १५ वर)

# कधी परतणार?

## (एका फार सुशिक्षित कऱ्हाडे ब्राह्मण कुटुंबातील एकाची गाथा)


श्री. वा. ना. रायकर, डोंबिवली
मो. : ७७३८४ ५५५८८

दि. १९ फेब्रुवारी २०१९ च्या तसेच २९ फेब्रुवारी २०१९ च्या महाराष्ट्र टाइम्समधील बातम्या वाचल्या असतील. १९ फेब्रुवारी जैश कमांडरसह तिघांना कंठस्थान. पण यांना कंठस्नान देताना मेजरसह चार जवान हुतात्मा झाले.

२७ फेब्रुवारीला पाकिस्तानात घुसून जैशचे स्थळ उद्धवस्त केले. मसूद अझहरला धक्काच बसला. कारण या सर्वांचा लढाई करुन स्थळ उद्धवस्त करायचा विचार होता, तो पूर्णपणे अयशस्वी झाला. 'पुलवामा' येथे सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत संघटनेच्या तीन दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. पण यामध्ये आपला एक मेजर व चार जवान, एक पोलीस हुतात्मा झाले असूनही त्या गोष्टीला अजून अधिकृत दुजारा मिळाला नाही. २७ फेब्रुवारीची बातमी म्हणजे पुलवामा हल्ल्याचा हिशोब पाकिस्तानात घुसून जैशचा तळ उद्धवस्त करून चुकता केला. विंग कमांडर अभिनंदन वर्धमन चाहत्यानंतर विजयवीर भारतभूमि परतले. प्रधानमंत्री, राष्ट्रपतींनी आनंद व्यक्त केला. अतिशय आनंददायी अशी घटना सर्वांनाच आनंदायी वाटली.

हे सर्व लिहिण्यामागे हेतू पुढील वाचनानंतर लक्षात येईल. सन १९७१ मध्ये युद्धाच्या वेळी फ्लाईट लेफ्टनंट विजय तांबे अंबाला येथे होते. आदेश येताच त्यांचे मिग विमान अन्य विमानाबरोबर आकाशात झेपावले. काही वेळातच पाकी वायुदल व सैन्यदलातर्फे विमानवेधी तोफांनी प्रतिकार करत हल्ला केला. ह्यात फ्ला. लेफ्टनंट श्री. विजय तांबे यांनी विमान पडण्यापूर्वी पॅरॅशूटच्या आधाराने (साह्य घेऊन) झेप घेतली आणि ते पाकिस्तानच्या भूप्रदेशात उतरते झाले. फ्लाईट लेफ्टनंट विजय तांबे यांना अटक झाली, अशी बातमी पाकिस्तानी वृत्तपत्रात आली. पण त्यानंतर त्यांचा आत्तापर्यंत कुठेही पत्ता लागला नाही.

फ्लाईट लेफ्टनंट विजय तांबे हे नागपूरचे. नागपूरच्या बिशप कॉटन शाळेत त्यांचे शिक्षण झाले. त्यानंतर वायुदलात गेले. बॅडमिंटनपटू दमयंती सुभेदार यांनी चार महाराष्ट्र अजिंक्यपद मिळविले. नंतर त्यांचा विजय तांबेंशी विवाह झाला व दमयंती सुभेदार, या दमयंती तांबे झाल्या. त्यांचे वडील सैन्यात होते, नंतर ते आय.ए.एस. होऊन शासनात सचिवपदापर्यंत कार्यरत होते. निवृत्तीनंतर पुण्यात स्थायिक झाले.



१९७१ मधील बांगलादेशाच्या विजयानंतर भारत-पाक युद्ध संपले. त्या वेळी भारताने पूर्व पाकिस्तानात ९३ हजार सैनिक व अधिकाऱ्यांना युद्धकैदी बनविले होते. भारताचे ५४ सैनिक व अधिकारी पाक कारागृहात युद्धकैदी म्हणून होते. लगेच भारत-पाकमधला 'सिमला करार' झाला. आपल्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व पाकचे पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांच्यात हा करार झाला. असे ठरले की पाकिस्तानचे कैदी सन्मानाने पाकमध्ये परतले. १९६५च्या युद्धाच्या वेळी भारतातील श्री. नंदकरिअप्पा पाकच्या तावडीत सापडले. त्या वेळी पाकचे अध्यक्ष आयूब खान होते. ते नेहमी करिअप्पा यांच्याबरोबर वरिष्ठ अधिकारी म्हणून होते. त्यांना बंदसह सर्वांची काळजी घ्या, असे अध्यक्ष श्री. आयूब खान यांनी सांगितले. नंतर करिअप्पा भारतात परतले व एअर मार्शल पदावरून निवृत्त झाले.

१९७१ च्या युद्धामध्ये फ्लाईट लेफ्टनंट असलेले दिलीप परुळेकर (ग्रुप कॅप्टनपदावरून निवृत्त), एम्. एस्. गरेवाल, हरिसिंगजी यांनाही पाकने युद्धकैदी केले होते. तसेच विद्याधर चारीही होते. पुढे विंग कमांडरपदावरून निवृत्त झाले. कर्नल विजय तांबे यांचा पत्ता लागला नाही व मुक्तही झाले नाहीत.


१९७९ मध्ये दमयंती तांबेंना फोन आला की ''पाकच्या एका कारागृहात त्यांच्या एका नातेवाइकांनी विजय तांबेंना पाहिले.'' विजयचे चुलत काका पाकिस्तानात गेले व एका जनरलमार्फत एका कारागृहात भेटण्यासाठी 'विजय' हाक मारली. त्या मारणाऱ्या व्यक्तीच्या नजरेला नजर दिसत नसल्यामुळे समजू शकले नाही. म्हणून विजयच्या चुलत काकांनी म्हणजे संजय जठारांना विजयला ओळखले. पण विजय तांबे यांना घरी परत आणता येत नाही, असे समजले. नंतर असे समजले की, दोन भारतीय भारतात परत आले होते. त्यामुळे फ्लाईट लेफ्टनंट श्री. विजय तांबे नक्कीच परत येतील, हा विश्वास वाढला. पण ४८ वर्षे होऊनही अजून परतत नाही. हा विचार दमयंती तांबेंच्या मनाला सलतो. मनात वेदना होते. आशा-निराशेवर जगणे किती आवघड आहे याची नुसती कल्पना करावी. आशा आणखी आहे की, प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदीजी आहेत. वीरमातेचे अभिनंदन करण्यात धन्यता मानणारे आहेत. दुसरा विचार येतो की, गुन्हेगार असणाऱ्यांना भारताच्या ताब्यात दिल्याशिवाय भारताने उघडलेली आघाडी शांत राहणार नाही. हा मुद्दा जोडला पाहिजे, तरच ४८ वर्षे उराशी बाळगलेली ही वेदना निर्माल्यवत होऊ नये म्हणून फक्त आणि फक्त विचार येतो की- फ्ला. लेफ्टनंट विजय तांबे मन मोठे करून विचारावेसे वाटते, आपण कधी परतणार?

# Diabetes Mellitus

Dr. Anish Alurkar. KBBF
Cell: 937 303 5050

Diabetes Mellitus commonly known as Type II Diabetes is the one of the challenging health problems in the society. It is considered as the third most prevalent fatal ailment in the world. Indian population is more prone to diabetes as lifestyle changes have contributed significantly in availability of food, high calorie intake/ junk food, and lack of physical activities, which has a major impact on metabolic programming of an individual.

Synthetichypoglycemicagents (allopathic medicines / insulin) have serious side effects in the long run as they are designed to lower blood sugar levels only and do not act on the root cause. Alternative medicine such as Homoeopathic and Ayurvedic medicine involves the use of herbs and fruits as alternative / supplementary therapy to mainstream western medical treatment. A recent study has estimated that up to 30% of patients with diabetes mellitus use alternative medicine to maintain their healthy blood sugar levels. We at 'Alfa Omega Healthcare' have developed a flagship ayurvedic product for managing and possibly reversing Diabetes.




**Managing Diabetes is a need for your body...**

**Lifestyle changes :**

- Don't indulge in day-time sleep.
- Should take care not to injure yourself as you take time to heal. As a result, there is a possibility of the wound becoming septic.
- Foot care by thorough cleaning everyday.
- Exercise must be done like walking, cycling, swimming, jogging etc for minimum 45 minutes 4-5 times a week.

**Diet :**

Have meal only twice a day (Breakfast & Lunch) Body does not need food after 6pm for living. For evening hunger management, A cow milk / fruits / soup / salad can be consumed.

Fruits containing high glycemic index such as chickoo, custard apple, watermelon and pineapple to be stopped completely. You can eat mango.

Have olive oil / natural oil from wood churner for cooking. Do not mix any 2 oils at one time as each oil has different boiling points.

Add oats to your daily diet.

Avoid dairy products in all forms if you are on insulin as milk helps deposit fat on cells of muscles.

Have raw steamed vegetables & herbs as they play a part in easy digestion.

---

**पान १३ वरुन**

तसा नित्याचा. या पार्श्वभूमीवर इथे सर्व कसं शिस्तबद्ध. भोजनोत्तर आइस्क्रीम आणि पानाच्या स्टॉलकडे आम्ही मोर्चा वळविला. तेवढ्यात मला आमच्या बँकेतील श्री. कुलकर्णी यांनी हाक मारली. माऊली ब्लड बँकेला मी पाचशे रुपये देणगी दिल्याची पावती त्यांनी माझ्या हातात दिली. माझ्या चेहऱ्यावरील आश्चर्य, गोंधळ, प्रश्नार्थक भाव. त्यांच्या लक्षात आले. त्यांनी मला सांगितले की, 'स्वागत समारंभात राहभागी होऊन, आपण पेंढारकर कुटुंबीयांचा आनंद द्विगुणित केलात, नवदांपत्याला लाख मोलाचे आशीर्वाद दिलेत म्हणून डॉ गिरीश पेंढारकर यांनी तुमच्या वतीने माऊली ब्लड बँकेस पाचशे रुपयांची देणगी दिली आहे. तुमचे हे रिटर्न गिफ्ट आहे. स्वागत समारंभाला येणाऱ्या प्रत्येकालाच देणगीच्या पावतीचे रिटर्न गिफ्ट दिले जाणार आहे. रिटर्न गिफ्ट इतके अंचबित करणारे आणि प्रेरणादायी असू शकते, याची मी कधीच कल्पनादेखील केली नव्हती. स्वागत समारंभाला त्यामुळे एक वेगळे परिमाण, वेगळी उंची लाभली आणि गिरीशच्या व्यक्तिमत्त्वाचे गारूड सर्वांच्या मनात घर करून राहिले.

मंडळी, दातृत्वाची धन्यता ज्या हातांना लाभते, त्यांनाच 'चंदनाचे हात' असे म्हणतात. दातृत्वाची अशी धन्यता डॉ. गिरीशला लाभली, ही भाग्याची गोष्ट. एक विचार मनात आला 'धन्य ते माता-पिता, ज्यांचा हा सुपुत्र.' शेवटी शब्दांचा हा प्रवास येथेच थांबविताना क्षणभर कवितेच्या अमृतधारा मनात बरसल्या- 'दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती।।'

# KBBF (कऱ्हाडे ब्राह्मण बेनेवोलंट फाउंडेशन) चे योगदान

यशोधन नाटेकर,
मो. ९६७३३०४४१२.

सद्‌गुरूंचा वरदहस्त असला की, सर्व अडचणींतून मार्ग निघतो आणि कामेसुद्धा आपसूक मिळत जातात. याचे प्रत्यंतर मी नुकतंच अनुभवलं. रत्नागिरी जिल्ह्यातील पावस येथील सद्‌गुरू स्वामी स्वरूपानंद यांच्या समाधी मंदिराची Virtual Tour, सेवा मंडळाची वेबसाईट आणि मोबाईल ॲप करण्याचे भाग्य आम्हाला- म्हणजेच आमच्या 'ॲप्लेक्स ग्रुप, पुणे'ला लाभले. पावस म्हणजे देसाई बंधू आंबेवाले यांची कर्मभूमी, स्वामींच्या अस्तित्वाने पुनित झालेले क्षेत्र. तेथे जाऊन स्वामींचे कार्य करुन स्वामींचा आशीर्वाद मिळाला आणि अगदी महिनाभरातच त्यांच्याच रेफरन्सने आळंदी देवस्थानाचे काम करण्याबाबत विचारणा करण्यात आली.

स्वामींच्या कामामुळे पावसच्या मंदिराची संपूर्ण व्यवस्था पाहणारे व कार्याध्यक्ष श्री. जयंत देसाई यांच्याशी उत्तम ओळख झाली होती. तसेच स्वामींचे ॲपदेखील देसाई परिवारात सर्वांपर्यंत पोहचले होते. याच जयंत देसाई यांचे पुतणे, जयंतरावांच्या मोठ्या बंधूंचे श्री. वसंत देसाई यांचे सुपुत्र श्री. योगेश देसाई यांनीदेखील हे ॲप पाहिले व ते स्वामींच्या ॲपच्या प्रेमातच पडले. श्री. योगेश देसाई हे आळंदी देवस्थान येथे सरकार नियुक्त विश्वस्त असून २०१९ च्या वारी सोहळ्याचे प्रमुखदेखील होते. आळंदी देवस्थनाच्या विश्वस्तांचा वारींमध्ये वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी आणि सर्व यंत्रणेच्या मदतीसाठी एक सॉफ्टवेअर आणि मोबाईल ॲप करण्याचा विचार सुरु होता. त्याच वेळी स्वामींचे ॲप श्री. योगेश देसाई यांनी पाहिले आणि पावस येथून आमचा मोबाईल नंबर घेवून संपर्क केला. आणि 'हे काम तुम्हीच करा अशी गळ घातली.'

हा फोन येण्याच्या काही दिवसांआधी मी व माझी पत्नी आळंदीचे काम कसे करता येईल, माऊली त्यांची सेवा करण्याची संधी कधी देतील असा विचार करत होतो व थोड्याच दिवसांत श्री. योगेश देसाई यांचा कामासंदर्भात फोन आला. माऊलींचे काम आणि पावसचा संदर्भ यामुळे ह्या कामाला नाही म्हणणे शक्यच नव्हते, पण कामासाठी असणारा वेळ मात्र खूपच कमी होता. हाती होते अवघे २० दिवस आणि काम मात्र डोंगराएवढं! पण माऊलींचीच कृपा की, ऑफिसमधील सर्व सहकाऱ्यांनी हे आव्हान स्वीकारलं व रात्र-दिवस करून काम पूर्ण केलं. कामाचं स्वरुपही जरा अवघड.केल आम्ही आधी अशी कामे केली नव्हती. पण तीदेखील संधी मिळाली. या आळंदी देवस्थानात वारीमध्ये साधारण ३००-३५० दिंड्या असतात. त्यांची स्वतःची वाहने असतात. त्यांची स्वतःचीदेखील वाहने असतात. शिवाय संस्थानची स्वतःची देखील वाहने असतात. अशी सगळी मिळून ५०००-५५०० वाहने असतात. ते पास नव्याने डिझाइन करायचे, एक सॉफ्टवेअर तयार करून सर्व दिंड्यांची माहिती संकलित करायची. याच सॉफ्टवेअरमधून या गाड्यांचे पास प्रिंट करायचे आणि या सर्व वाहनांचे ट्रॅकिंग करायचे. हे ॲप व सॉफ्टवेअर जरी संस्थानने करून घेतलेलं असलं तरी ते वापरण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, आपत्कालीन व्यवस्थापन, मुख्यमंत्री कार्यालय या सर्वांना होता. तसेच वहानाच्या चालकांना होता. त्यामुळे याबद्दल गोपनीयता बाळगण्यात आली होती.

यासोबतच ते पास प्रिंट करून त्यांचे वाटप करण्याचे महत्त्वाचे कामदेखील आमच्यावरच सोपवले होते. आळंदी ते सासवड माऊलींच्या दिंडीसोबत राहून हे काम करायचे होते. कारण माऊलींच्या प्रस्थानाच्या २ दिवस आधी दिंड्या येण्यास सुरुवात होते. मग देवस्थानाकडून वाहनक्रमांक इ. भरण्याचा







माउली विठ्ठल यात्रा - २०१९



पालखी सोहळ्याच्या सुरक्षेसाठी 'माउली ॲप'

फॉर्म घेऊन, योग्य त्या अधिकाऱ्यांच्या सह्या घेऊन मग तो फॉर्म माहिती भरण्यासाठी दिला जाई. मग पास प्रिंट होऊन त्याचे वाटप केले जाई. काही दिंड्यांची ६०-७० वाहने होती. तसेच काही दिंड्या पुणे मुक्कामी, सासवड मुक्कामी पास घेतात. त्यामुळे सासवडपर्यंत वारीसोबत राहणे आवश्यक होत.

या सगळ्यात प्रमुख अडचण होती पास तयार करून घेणे, जागेवर प्रिंट काढण्यासाठी प्रिंटर असणे आणि सॉफ्टवेअर ऑनलाईन असल्याने माहिती भरण्यासाठी इंटरनेट उपलब्ध असणे. पण आपल्याच KBBF पुणे विभागातील सदस्यांच्या सहकार्यामुळे ह्या अडचणी अगदी सहज सुटल्या.

प्रिंटर्सच्या क्षेत्रात काम करणारे व KBBF पुणे विभागाचे खजिनदार श्री. उमेश देऊस्कर (Uniciti Solutions Pvt. Ltd.) यांनी त्यांच्याकडील ३ प्रिंटर टोनर पूर्ण भरून कोणताही मोबदला न घेता वापरण्यास दिले. आम्ही विचारले आणि सर लगेच तयार झाले. तत्पूर्वी कामाचे स्वरूप जाणून घेऊन, प्रिंट करावयाच्या पासच्या पेपरची क्वॉलिटी जाणून घेऊन या कामासाठी कोणता प्रिंटर उपयुक्त ठरेल याची उत्तम माहिती दिली. सरांनी आमच्या या कामात दाखवलेली उत्सुकता आणि दिलेली माहिती यामुळे काम करण्यास अजून हुरूप आला. मदतीसाठी दिलेला हात खूप काही शिकवून गेला.

KBBF पुणे विभागातील सौ. अनिता घाटणेकर यांनी त्यांच्याजवळील JIO चा डोंगल पुढील ३ महिन्यांचा रिचार्ज करून वापरण्यासाठी दिला.

तसेच प्रिंटिंग क्षेत्रात असणारे श्री. प्रसाद कात्रे (Revolution) यांनी अक्षरशः चार दिवसांत पासचे डिझाईन करून त्याच्या ५००० प्रती तयार करून दिल्या, त्याही अगदी माफक दरात व कोणताही अधिकचा मोबदला न घेता. या सर्वांचे कितीही आभार मानले तरी ते कमीच पडतील. KBBF म्हणून प्रत्येक वेळी पैसाच महत्त्वाचा नसून कोणत्याही प्रकारची मदत आणि 'आम्ही तुझ्या पाठीशी आहोत' हा विश्वास वाटतो. ही अशी निःस्वार्थी मदत मला दर वेळी KBBF मधून मिळत असते. त्यामुळे या सर्वांचे कितीही आभार मानले तरी ते कमीच आहेत या संपर्कच्या माध्यमातून या सर्वांचे पुन्हा एकदा आभार मानण्याची संधी मला मिळाली आहे.

श्री. उमेश देऊस्कर, सौ. अनिता घाटणेकर, श्री. प्रसाद कात्रे आणि संपूर्ण KBBF टीमचे पुन्हा एकदा मनापासून आभार.


# जी. व्ही. गणपत्ये
# केमोक्रॅट्स सेल्स्

**फायबरग्लास रॉ मटेरिअल,**
**इपॉक्सी रेझिन्स, पॉलियुरेथिन रेझिन्स इपॉक्सीपुटीज (एम-सील)**
**लॅमिनेशन मटेरिअल, प्लायवूड बोर्ड्स**
**मिळण्याचे एकमेव ठिकाण.**

जोगेश्वरी मंदिरासमोरील गल्ली, वाघ चेंबर्स, ६४५, बुधवार पेठ,
सकाळ ऑफिसजवळ, पुणे - ४११ ००२.
ऑफिस (०२०) २४४५२११०, २४४५९८३४ मो. ९८२२० २४२१०

# पितांबरीच्या पुणे येथील विभागीय कार्यालयाचे उद्घाटन

श्री. उदय आगाशे
फोन : ०२२-६७०३४७१४

पितांबरी उद्योगाचा आगामी काळातील विस्तार ध्यानात घेऊन पुण्यात डेक्कन परिसरातील घोले रस्त्यावर आयसीआयसीआय बँकेच्यावर, मध्यवर्ती




परिसरात एका प्रशस्त वास्तूत अद्ययावत सोईसुविधांनी युक्त असे कार्यालय सुरू करण्यात आले. दि. १९ जून २०१९ रोजी पितांबरीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यालयातून पितांबरीच्या सर्व विभागातील विक्रीचे काम होणार आहे. पुण्यासोबत पश्चिम महाराष्ट्रातील ग्राहकांना या सेवांचा लाभ घेता यावा, या उद्देशाने पितांबरीने पुण्यात कार्यालय सुरू केले आहे. त्यानिमित्ताने सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते.

श्री. रवींद्र प्रभुदेसाई हे कऱ्हाडे ब्राह्मण संघ ठाणे व कऱ्हाडे ब्राह्मण बेनेवोलंट फाउंडेशन (KBBF) च्या ठाणे विभागाचे सदस्य आहेत. कार्यालयाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने KBBF पुणेच्या पदाधिकाऱ्यांनी श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांची भेट घेतली. KBBF पुणेच्या अध्यक्षा वैशाली वर्णेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन पितांबरीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या निमित्ताने KBBF पुणेचे खजिनदार उमेश देऊस्कर, कोअर कमिटीतील प्रकाश लघाटे, जयंत आठले, उदय पराडकर, विदुर पेंढारकर, मकरंद फणसळकर, यशोधन नाटेकर, सावनी पुरंदरे, अन्य सभासद उपस्थित होते. यांच्यासोबत KBBF पुणेचे मानद सभासद डॉ. योगेश गुर्जर व प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक दिलीप कोटीभास्कर




यांनीसुद्धा खास उपस्थित राहून श्री. प्रभुदेसाई यांना शुभेच्छा दिल्या. यांच्यासोबतच KBBF सिंधुदुर्गचे बाळ पुराणिक हेसुद्धा या कार्यक्रमासाठी खास सिंधुदुर्गहून आले.

।। श्री आर्यादुर्गा प्रसन्न ।।

गणेश गुर्जर परिवारातर्फे कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास

**हार्दिक शुभेच्छा!**



व्यावसायिक प्रतिष्ठान

**SDS ENTERPRISES**

'Sarthak', 4/5/5 A, Erandwane, Patwardhan Sahakari

Grih Rachana Sanstha Mydt, Pune 411 004.

Solution for all Computer Needs

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ मुंबई, जागतिक महिला दिन

दि.१७ मार्च २०१९ रोजी 'चंद्रेश्वर हॉल' गिरगाव, मुंबई येथे कऱ्हाडे ब्राह्मण संघ मुंबई महिला सदस्यांनी 'जागतिक महिलादिन' साजरा केला. असंख्य आठवणींचा खजिना म्हणजे फोटो. या वर्षी उपरोक्त संघाने महिलादिनाचे औचित्य साधून 'छायाचित्रकार' म्हणून कार्यरत असलेल्या महिलांचा गौरव केला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध व्याख्यात्या सौ. शिल्पा नवरे आणि प्रमुख अतिथी म्हणून सौ. वीणा गोखले (सुप्रसिद्ध छायाचित्रकार गौतम राजाध्यक्ष ह्यांच्या शिष्या) ह्या उपस्थित होत्या. छायाचित्रकारितेत पुरुषवर्गाची मक्तेदारी मोडीत काढून पुरुषांच्या बरोबरीने महिलाही काही कमी नाहीत, अशा १० महिला छायाचित्रकारांचा गौरव करण्याचे ठरविले. ह्या सर्व गौरवप्राप्त महिलांपैकी काही नवोदित, तर काही हौस म्हणून, तर काही व्यावसायिक म्हणून कार्यरत आहेत. अशा सर्व महिलांचा त्यांच्या कार्यासाठी संघाने गौरव केला. शाल, गौरवचिन्ह, पुष्पगुच्छ व समई देऊन त्यांना सन्मानित करण्यात आलं. समईच्या प्रकाशाप्रमाणे या सर्वांचे कर्तृत्व सर्व दिशांना पसरावे, अशी सदिच्छा कऱ्हाडे ब्राह्मण संघ मुंबईने दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अमृता किर्लोस्कर यांनी केले. सौ. वीणा गोखले यांनी गौरवप्राप्त महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले आणि त्यांना आलेल्या चांगल्या-वाईट अनुभवाचे कथन केले. सौ. शिल्पाताई नवरे यांनी आपल्या मार्गदर्शनात 'स्त्री ही शक्ती आहे, पण त्या शक्तीचा योग्य उपयोग करून घराबाहेर कार्यरत असताना घरातील मंडळींना योग्य तो मान, वेळ देणे गरजेचे आहे' असा सल्ला दिला. महिला गौरवमूर्ती पुढीलप्रमाणे - सौ. विजया टेंबे, सौ. रचना पिंपुटकर, कु. सानिका देवडीकर, सौ. अमृता ढवळे-लघाटे, कु. लीना मांजरेकर, कु. श्वेता राणे, कु.



मोहिनी कुळये, कु. आकृती सारंगधर, कु. तेजस्विनी मणेरीकर, कु. गौरी डोंगरे. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी संघाच्या महिला कार्यकर्त्या सौ. भाग्यश्री सरपोतदार (उपकोषाध्यक्ष), सौ. अलका डोंगरे, सौ. अंजली पंडित, सौ. अंजली धोपेश्वरकर, सौ. गौरी हर्डीकर, सौ. वृषाली तळेकर, श्रीमती शुभांगी टेम्बे, सौ. रसिका टेम्बे यांचे मोलाचे सहकार्य



लाभले. संघाच्या वतीने सर्व मान्यवरांचे, सत्कारमूर्तींचे आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघांच्या पदाधिकाऱ्यांचे व उपस्थित सर्वांचे आभार संघाच्या उपकार्यवाह सौ. अदिती तांबे यांनी मानले. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या १०० ते १२५ जणांना अल्पोपाहार व कॉफी देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

**सौ. अदिती अतुल तांबे**
उपकार्यवाह

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, जि. ठाणे. वसंतोत्सव

शनिवार, दिनांक २७ एप्रिल २०१९ रोजी संपन्न झालेल्या वासंतिक कार्यक्रमासाठी ठाणे परिसरातील ज्ञातीतील २५० हून अधिक बंधू-भगिनींनी आणि माहेरवाशीणींनी आवर्जून आपली उपस्थिती नोंदवली होती.

कार्यक्रमास कऱ्हाडे ज्ञातीतील मान्यवर, उद्योगपती, व्यावसायिक, उच्च पदस्थ, कलावंत उत्स्फूर्ततेने सहभागी झाले होते.

विशेष म्हणजे ठाण्याचे पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकरसाहेब व सौ. मेघाताई फणसळकर हे आपल्या कार्यात व्यग्र असतानाही त्यांनी या कौटुंबिक सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहून आपल्या कुटुंबाप्रति प्रेम व आदर व्यक्त केला.

संघाचे विश्वस्त व ठाण्याचे भूषण सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. रवींद्र प्रभुदेसाई (पितांबरी समूह), ठाणे संघाचे विश्वस्त व उद्योगपती श्री. प्रकाश गुणे, उद्योगपती श्री. श्रीधर नेवाळकर, कऱ्हाडेभूषण सुप्रसिद्ध लेखक आणि व्याख्याते गुरुवर्य श्री. नरहरी विष्णू तथा श्री. दाजी पणशीकर, पै. बिस्मिल्ला खाँसाहेबांचे पट्टशिष्य एकमेव कऱ्हाडे शहनाईवादक कऱ्हाडेभूषण पंडित श्री. शैलेश भागवत व सौ. भागवतवहिनी,

 * स्वातंत्र्य दिन व गणेशोत्सव निमित्त हार्दिक शुभेच्छा! * श्री. संजय आंबर्डेकर, ठाणे 

मुंबई कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे कार्याध्यक्ष व महासंघाचे अध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर आणि सौ. अंजलीताई आंबर्डेकर तसेच संस्कार भारतीच्या प्रमुख कार्यकर्त्या व कोकणप्रांत मातृशक्ती प्रमुख आदरणीय माधुरीताई शेंबेकर अशा सन्माननीय व्यक्तींच्या उपस्थितीने समारंभाची शोभा वाढली होती.

महिला सक्षम व्हाव्यात व त्यांचा समाजात सन्मान वाढावा, म्हणून या वेळच्या वसंतोत्सवाच्या वासंतिक कार्यक्रमानिमित्त प्रथमच समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील महिला- म्हणजेच घरकाम करणाऱ्या महिला, वाहतूक नियोजन महिला हवालदार, महिला रिक्षाचालक, कार्यालयातील महिला शिपाई अशा सर्व वर्गांतील महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यात संघाच्या महिलांचा सहभाग नेहमीच लक्षणीय असतो. या वेळच्या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा संघाच्या सहकार्यवाह सौ. स्वाती गुणे यांनी समर्थपणे पेलली.

वसंतोत्सव कार्यक्रमाची सुरुवात समई दीपप्रज्वलनाने होऊन कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या अनेक उपक्रमांची माहिती या वेळी देण्यात आली.

समारंभाचे प्रमुख पाहुणे श्री. दाजी पणशीकर यांच्या शुभ हस्ते कर्तृत्ववान महिलांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. अतिथी श्री. दाजीशास्त्री पणशीकर यांनी कुटुंबसूत्र आणि पसायदान ओव्यांचे महत्त्व आपल्या दैनंदिन जीवनात किती महत्त्वाचे आहे, हे आपल्या ओघवत्या वाणीने उपस्थितांना जाणवून दिले.

श्री. समीर लिमये यांनी समर्थ रामदासस्वामींच्या दासबोधातील विचारांवर आधारित आजच्या काळातील घडामोडींची सांगड घालून एका आगळ्यावेगळ्या कॉर्पोरेट कीर्तनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकले.

कार्यक्रमाचा समारोप अर्थातच सुग्रास भोजनाने झाला. कौटुंबिक वातावरणात आपल्या सग्यासोयऱ्यांशी स्नेहसंवाद साधत उपस्थितांनी परत भेटण्याच्या बोलीवर एकमेकांचा निरोप घेतला.

वासंतिक कार्यक्रम यशस्वी होण्यास अनेकांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हातभार लागला. त्यात प्रामुख्याने व आवर्जून नावे घ्यावी लागतील ती म्हणजे सहकार्यवाह श्री. सुजित मोघे, कार्यकारिणी सदस्य श्री. कुमार माईणकर, श्री. सचिन ताटके- इमारत निधी प्रमुख, श्री. संजय आंबर्डेकर- विश्वस्त, श्री. चंद्रशेखर पुरोहित- अध्यक्ष आणि आम्हां पुरुषांच्या बरोबरीने कामाची योग्य वाटणी करून ते पूर्णत्वास नेणाऱ्या संघाच्या हरहुन्नरी महिला वाघिणी सदस्या सौ. स्वाती गुणे- सहकार्यवाह, डॉ. सौ. श्रुती बोरवणकर- उपाध्यक्षा, सौ. सुहास नवरे, सौ. वर्षा मुळ्ये, सौ. ऐश्वर्या देवस्थळी, सौ. पल्लवी बोरवणकर, कुमारी कीर्ती मणेरीकर अशा सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागाने हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकला.

प्रत्येक कार्यक्रमातून आपण जरूर काही तरी शिकायचे असते व त्याप्रमाणे पुढील कार्यात त्याची सुधारणा करावयाची असते. या कार्यक्रमाद्वारे आमच्या समोर आलेल्या उणिवांचा आम्ही जरूर विचार करू व पुढील कार्यात त्यामध्ये जरूर सुधारणा करू. आपण केलेल्या योग्य सूचनांचा आम्ही सदैव आदरच करतो.

आपणा सर्व कऱ्हाडे ज्ञाती बंधू-भगिनींचे मी मनःपूर्वक आभार मानून वर्षातून होणाऱ्या पाच कार्यक्रमांत आपण वेळात वेळ काढून सहभागी होऊन आमच्या उत्साहाची ज्योत अशीच तेवत ठेवावी, ही विनम्र प्रार्थना.

सहकार्य आहेच, ते असेच राहो, ही विनंती. धन्यवाद.

**संदीप कळके**, कार्यवाह,
कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे

# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

रविवार, दि. १६ जून २०१९ रोजी कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाची त्रैमासिक मीटिंग हुबळी येथे संपन्न झाली.

एकूण वेगवेगळ्या संघांच्या म्हणजेच मुंबई, ठाणे, डोंबिवली, पुणे, नाशिक, नागपूर, रत्नागिरी, बंगळुरू, हुबळी, कोल्हापूर, सिरसी, इंदूर संघांच्या प्रतिनिधींची उत्स्फूर्त उपस्थिती होती.

मीटिंगच्या सुरुवातीला दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून मागील बंगळुरूच्या मीटिंगचे इतिवृत्त महासंघाचे कार्यवाह श्री. गणेश गुर्जर यांनी वाचून दाखवले. त्यानंतर महासंघाचे कोषाध्यक्ष श्री. संजय आंबर्डेकर यांनी जमा-खर्चाचा अहवाल वाचून दाखवला. ११ ऑगस्ट २०१९ या दिवशी महासंघाची GB म्हणजेच वार्षिक सर्वसाधारण सभा घ्यावी, असे एकमताने ठरले.

इंदूर कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी महासंघाने संपूर्ण सहकार्य देण्याचे एकमताने ठरले.

महासंघाचे उपाध्यक्ष श्री. नागराज उपांगला यांनी वेद, संस्कृती, वेगवेगळे उपक्रम म्हणजे गरीब विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय मदत, शैक्षणिक मदत, क्रीडाक्षेत्र या माध्यमातून कशा प्रकारे आपल्या ज्ञातीला पुढे नेता येईल यावर विचार प्रकट केले. हुबळी संघाचे डॉ. विजय जायदे, महासंघाचे कोषाध्यक्ष श्री. संजय आंबर्डेकर, महासंघाचे कार्यवाह श्री. गणेश गुर्जर, रत्नागिरी संघाचे श्री. माधव हिर्लेकर, कोल्हापूर संघाचे श्री. पावनगडकर, मुंबई संघाचे श्री. शरद गणपत्ये, नाशिक संघाचे श्री. खेर, ठाणे संघाचे श्री. संदीप कळके यांनी आपापल्या कऱ्हाडे ब्राह्मण संघांच्या वेगवेगळ्या समाजोपयोगी कार्यक्रमांची माहिती देऊन ज्ञातीबांधवांना एकत्रित कसे आणता येईल यावर आपले विचार मांडले व सकस चर्चा होऊन त्या दृष्टीने

महासंघाच्या सहकार्याने सर्व संघांनी पुढील वाटचाल करण्याचे एकमुखाने ठरले.

आणि बरोबर दुपारी १ वाजता भोजनासाठी २ तासांचा वेळ दिला गेला.

भिशीब्याळी भात म्हणजेच गरम डाळ-भात, गरमागरम दुधातील मांडे, रस्सम-भात, दही-भात, कोशिंबीर, पोळी-भाजी, दही, रस्सम असा दुपारच्या सहभोजनाचा सर्वोत्तम कऱ्हाडी बेत होता.

तसे कर्नाटक भागातील लोक हे अगत्यशील पण त्यातही अस्सल कर्नाटकातील कऱ्हाडे पाहुणचार म्हणजे दुग्धशर्करायोग नव्हे तर मणिकांचन योग असे म्हटले, तर ती अतिशयोक्ती ठरू नये. अस्सल कऱ्हाडा हा उत्तम चवीचे खाद्य पदार्थ बनवणारा आणि तितक्याच आत्मीयतेने प्रत्येक शहरातील प्रत्येक संस्कृतीतील शाकाहाराची चव चाखणारा असतोच. अगत्यशीलता व आदरातिथ्यही तितकंच वाखाणण्याइतपत उत्तम असतं.

त्यानंतर दुपारचे पर्व बरोबर २.३० वाजता सुरू झाले. महासंघाच्या कार्यवाहांनी काही सूचना, काही निर्णय आणि जुन्या व नव्या कार्यकारिणीची असलेली मांडणी विशद केली. अन्य सदस्यांकडून आलेल्या सूचनांचा उत्स्फूर्त स्वीकार केल्याचे जाहीर करून अन्य विषय घेऊन त्यावर महासंघाचे मतदेखील सांगितले. महासंघाचे माजी अध्यक्ष व नागपूर संघाचे विद्यमान अध्यक्ष श्री. आनंद पराडकर यांनी आपल्या छोटेखानी विद्वत्तापूर्ण भाषणात महासंघाचं कामकाज कशा पद्धतीने झालं पाहिजे, हे अत्यंत सोप्या भाषेत सांगितलं.

महासंघाच्या संपर्क मासिकाचे वितरण हे प्रत्येक कऱ्हाडे ज्ञाती-बांधवांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक संघाने संपर्क या त्रैमासिकाचे जे सभासद आहेत ते टिकवून व नवे सभासद वाढवून संपूर्ण सहकार्य करण्याचे आणि जाहिराती देखील मिळवण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहनदेखील केले गेले.

सरतेशेवटी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते हुबळी कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या जडणघडणीत जे योगदान देणाऱ्यांत हयात नाहीत त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची सर्वंकष माहिती अत्यंत आदरपूर्वक देऊन सन्मानित केले, तर जे हयात आहेत त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची माहिती देऊन प्रत्येकाला यथोचित सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले.

हुबळी संघाच्या सन्मानित आधारस्तंभांनी आपापल्या सन्मानाचा अत्यंत आदराने स्वीकार करून आपले मनोगत व्यक्त केले.

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर यांनी आपल्या भाषणात 'हुबळी संघाच्या सन्मानित सदस्यांचा हा सन्मान नसून कऱ्हाडे ज्ञातीसाठी घेतलेल्या त्यांच्या अविरत कष्टांचा हा सन्मान आहे' हे सांगून कृतज्ञता व्यक्त केली. आजच्या मीटिंगची फलश्रुती काय, हे सांगून उपस्थित असलेले सदस्य परत जाताना हुबळीतून एक संदेश व उत्साह घेऊन जात असल्याचे सांगितले.

**सचिव, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे

दिनांक १८ जून, २०१८ रणरागिणी, स्वातंत्र्यसेनानी, झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांचा पवित्र स्मृतिदिन. पुणे संघातर्फे, बालगंधर्व रंगमंदिर परिसरात असलेल्या अश्वारूढ पुतळ्याला पहिला पुष्पहार पुण्याच्या प्रथम नागरिक मा. सौ. मुक्ता टिळक महापौर यांनी अर्पण केल्यानंतर पुणे संघाचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई यांनी पुण्याच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर राष्ट्रसेविका दल आणि हिंदु महिला सभा तसेच मॉडर्न गर्ल्स हायस्कूलच्या वतीने मुख्याध्यापिका यांनी पुष्पहार अर्पण केला.

याप्रसंगी कार्यकारिणी सभासद श्री. फणसळकर, श्री. सतीश भोपटकर, श्री. गोपाळ भाटवडेकर, श्रीगजानन गुर्जर, श्री. श्रीकांत गुर्जर, श्री. सप्रे, सौ. मुक्ता चांदोरकर, सौ. वैशाली वेर्णेकर, आणि महासंघाचे सचिव श्री. गणेश गुर्जर तसेच श्री. गिरीश शेवडे, के.बी.बी.एफ. चे अमित शहाणे, श्री. यशोधन नाटेकर यांच्यासह संघाचे अनेक सन्माननीय सभासद उपस्थित होते. सर्वांनी झाशीच्या राणीला अभिवादन केले. मॉडर्न हायस्कूलच्या बँड पथकाने मानवंदना दिली.



त्यानंतर चर्चा करताना पुतळ्याच्या आजूबाजूस सुशोभिकरण केले आहे त्याबद्दल अध्यक्ष ह्यांनी महापौर यांचे अभिनंदन केले व उद्घाटन पाटी आहे त्याची रंगरंगोटी करून घ्यावी अशी सूचना महापौर यांना केली.

हा झाशी राणी पुतळा कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे तत्कालीन सदस्य श्री. ल. भो. भोपटकर, श्री. दत्तो वामन पोतदार व रँग्लर परांजपे यांच्या प्रयत्नातून उभा राहिला. सन १९५७ साली पुणे संघाने ₹ १८०००/- हा एकूण ७४,००० खर्चातील वाटा उचलला. डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते या पुतळ्याचे उद्घाटन दि. १७ जून १९५७ रोजी झाले. तेव्हा पासून १७ जून रोजी हा कार्यक्रम पुण्यात होत असे. परंतु संघाची २०१६-१९ ची कार्यकारणी आल्यानंतर याची जबाबदारी घेऊन हा कार्यक्रम पुण्यात पण १८ जून रोजी करण्यासाठी महापालिकेस पत्र दिले त्याप्रमाणे योग्य बदल पुणे मनपाने पण करुन घेतला आहे.

**अध्यक्ष, क.ब्रा.संघ, पुणे**

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली, जि. ठाणे

## बालक-पालक मेळावा २०१९ - संस्था वृत्त

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळातर्फे शिक्षण समिती व डोंबिवली पश्चिम नगर कार्यकारिणी यांनी आयोजित केलेला बालक-पालक मेळावा दि. १४/७/२०१९ रोजी सायंकाळी ०४.३० वा. संस्थेच्या कै. गो. ग. देव सभागृह-समाजमंदिर येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. श्री. अद्वैत ल. पाध्ये, संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. सुहास म. पंडित, सरकार्यवाह श्री. नितीन स. शेंबेकर व संस्थेचे अन्य पदाधिकारी यांचे हस्ते दीपप्रज्वलन व शारदापूजन करून या मंगलमय कार्यक्रमाची सुरुवात झाली. कु. मृणाल देवस्थळी हिने सुरेल आवाजात ईशस्तवन सादर केले.

त्यानंतर डोंबिवली पश्चिम नगर कार्यकारिणीचे कार्यवाह श्री. ओंकार उ. खेर यांनी सरकार्यवाह श्री. नितीन स. शेंबेकर यांना प्रास्ताविक करण्याची विनंती केली. त्यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा थोडक्यात घेत आगामी काळात होऊ घातलेल्या काही गोष्टींची उपस्थितांना माहिती दिली.

प्रास्तविकानंतर सौ. अनघा अ. बोंद्रे यांनी प्रमुख पाहुणे मा. डॉ. अद्वैत ल. पाध्ये यांचा परिचय करून दिला. यानंतर अध्यक्षांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा शाल, श्रीफळ, मानचिन्ह व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमानंतर शिक्षण समिती प्रमुख सौ. मीनाक्षी प. काळेले मॅडम यांनी संस्थेतर्फे चालू असलेल्या शिक्षण दत्तक योजनेंतर्गत गरजू विद्यार्थ्यांना मदतीची माहिती दिली आणि ह्या वर्षीपासून ११ व १२ वीच्या गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यात आल्याचे सांगितले व सुरू करावयाच्या आगामी उपक्रमांची माहिती दिली.

या नंतरचा सर्वांत महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे संस्थेचे अध्यक्ष श्री. सुहास म. पंडित व सरकार्यवाह श्री. नितीन स. शेंबेकर व शिक्षण समिती प्रमुख सौ. मीनाक्षी काळेले यांच्या हस्ते शिक्षण दत्तक योजनेंतर्गत लाभार्थी विद्यार्थी/ विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते धनादेश व विद्यार्थ्यांना उपयोगी अशा वह्यांचे वाटप करण्यात आले. शिक्षणदत्तक योजनेतील १ली ते १२ वीचे ४३ पैकी ४० लाभार्थी विद्यार्थी/ विद्यार्थिनी हजर होते. या योजनेतील विद्यार्थ्यांचे १ ली ते ४ थी, ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी असे तीन गट करून चित्र रंगवण्याची स्पर्धा घेण्यात आली होती. प्रत्येक गटात प्रथम, द्वितीय क्रमांकाच्या स्पर्धकाला बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेत एकूण ३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. विजयी स्पर्धकांना प्रमुख पाहुणे मा. डॉ. अद्वैत पाध्ये यांचे हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

उच्च पदवीधर, पदवीधर व १० वी व १२ वी परीक्षेत उज्ज्वल यश प्राप्त करणाऱ्या ज्ञातीतील १५ गुणवंत विद्यार्थी/ विद्यार्थिनींचा कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. अद्वैत पाध्ये यांच्या हस्ते धनादेश देऊन गुणगौरव करण्यात आला.

यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. अद्वैत पाध्ये यांनी विद्यार्थी व पालक यांना अत्यंत सोप्या भाषेत विचाराइतकेच भावनांना महत्त्व असते, हे सोदाहरण पटवून देऊन मार्गदर्शन केले.

यानंतर मा. अध्यक्षांनी आपल्या भाषणात संस्थेच्या एकूण कार्याच्या आढाव्या-बरोबरच पुढील वर्ष सुवर्णमहोत्सवी असून ते अत्यंत उत्साहात व भव्य-दिव्य स्वरूपात साजरे करण्याचा मनोदय व्यक्त केला. श्री. ओंकार खेर यांनी संपूर्ण कार्यक्रमाची सूत्रसंचलनाची व आभार प्रदर्शनाची जबाबदारी उत्कृष्टपणे पार पाडली.

कार्यक्रमाची सांगता श्रीमती प्राची देवस्थळी यांच्या भावपूर्ण आवाजातील पसायदानाने झाली व नंतर उपस्थित असलेल्या सर्वांनी अल्पोपाहार व थंड पेयाचा आस्वाद घेतला आणि हा अतिशय सुंदर कार्यक्रम संपन्न झाला.

**शिक्षण समिती कार्यवाह,**

**श्री. वसंत मुळ्ये**

With best compliments from...



MUKESH V. JOSHI

INSURANCE & INVESTMENT ADVISOR

CONTACT FOR

Life Insurance
Pension Planning
Mediclaim
Fire Insurance
Mutual Fund
Fixed Deposits

ADDRESS

"Shri Neelkamal" Anandpura, Nr. Govt. Press,
Kothi Road, Vadodara-390 001
Ph.: 0265-2412812 Mobile : 098250 25006

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली

**कांदेनवमी – संस्थावृत्त**

रविवार, दि. ०७/०७/२०१८ रोजी संध्याकाळी ४.०० वा. संस्थेच्या कै. गो. ग. देव समाजमंदिर सभागृहात कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली पूर्व नगर कार्यकारिणी व सांस्कृतिक समिती आयोजित 'कांदेनवमी' हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेश-पूजन व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. या कार्यक्रमाचे सादरीकरण २ टप्प्यांमध्ये झाले. त्यातील पहिला टप्पा हा सभासद व त्यांचे नातेवाईक यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी झाला. यात कवितावाचन, गायन, तबलावादन, पेटीवादन, कथाकथन यांचे सादरीकरण झाले. हा कार्यक्रम अतिशय शिस्तबद्ध व नियोजित वेळेत पार पाडला. सर्व सभासदांनी उत्तम सादरीकरण केले. यामध्ये गायन सादरीकरणात श्री. महादेव पाध्ये व कु. अथर्व चांदोरकर यांनी तबला व पेटीची उत्तम साथ-सांगत केली. त्यांचा संस्थेने अध्यक्षांतर्फे पुस्तक भेट देऊन यथोचित सन्मान व आभार व्यक्त केले. मधल्या वेळेत संस्थेचे सरकार्यवाह श्री. नितीन स. शेंबेकर यांनी संस्थेचे प्रास्ताविक सादर केले.

दुसरा टप्पा श्री. अशोक शेवडे निर्मित 'चंदेरी सोनेरी' या कार्यक्रमांने झाला. याअंतर्गत श्री. अशोक शेवडे यांनी त्यांच्या कारकिर्दीत घेतलेल्या वेगवेगळ्या मुलाखतींचे किस्से सांगितले व स्वतःचेही अनुभव सांगितले. त्यांना सुरेल निवेदनाची साथ श्रीमती प्राची देवस्थळी यांनी केली. कार्यक्रमाची सांगता सौ. प्राची देवस्थळी यांच्या सुरेल संगीतमय गाण्यांनी झाली. श्री. अशोक शेवडे व सौ. प्राची देवस्थळी यांचा संस्थेमार्फत संस्थेचे अध्यक्ष श्री.सुहास पंडित यांनी पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान केला.

दोन्हीही कार्यक्रम खूप उत्साहात व उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडले. कार्यक्रमाची सांगता भोजनाने झाली. त्यामध्ये कांदाभजी, गरम मसाल्याची आमटी-भात, काळा वाटाणा उसळ, जिलेबी-मठ्ठा इ. चवदार पदार्थ होते. चविष्ट जेवणाने कार्यक्रमाची शोभा अधिकच चविष्ट केली.

असा हा कांदेनवमीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला साधारण २०० लोकांची उपस्थिती होती.

**डोंबिवली पूर्व नगर कार्यकारिणी**

**सौ. अंजली वि. साधले**

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवलीची वार्षिक सहल हैदराबाद येथे आयोजित केली आहे. त्याची रूपरेषा पुढीलप्रमाणे-

**वार्षिक सहल**

**हैदराबाद, श्रीशैल्यम, नागार्जुनसागर**

(२३ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१९)

**इंदूर – उज्जैन – मांडू** या सहलीच्या यशस्वी आयोजनानंतर आता आम्ही हैदराबाद येथे वार्षिक सहल आयोजित करीत आहोत.

**सहलीचे ठिकाण :- हैदराबाद, श्रीशैल्यम, नागार्जुनसागर**

सहल कालावधी :- २३ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर, २०१९

**स्थळदर्शन** :- रामोजी फिल्म सिटी, सालारजंग म्युझियम, लुम्बिनी गार्डन, एन टी आर गार्डन, कार म्युझियम, स्नो वर्ल्ड, श्रीशैल्यम, नागार्जुनसागर

**सहल खर्च :-** रु. १६००० + रेल्वे भाडे

**सहल खर्च ह्या पद्धतीने जमा करावा :-**

**नावनोंदणी आणि पहिला हप्ता :-** ३० जून २०१९ पर्यंत रु. ६०००/-

**दुसरा हप्ता :-** १५ ऑगस्ट २०१९ पर्यंत रु. ४०००/- आणि रेल्वेभाडे

**तिसरा हप्ता :-** १५ सप्टेंबर २०१९ पर्यंत रु. ३०००/-

**चौथा हप्ता :-** ३१ ऑक्टोबर २०१९ पर्यंत रु. ३०००/-

**रेल्वे प्रवास** (3C) **:-**

मुंबई - हैदराबाद (हैदराबाद एक्सप्रेस)

सिकंदराबाद-एल टी टी (दुरांतो एक्सप्रेस)

**सूचना :-**

१. दुरांतो एक्सप्रेसचे तिकीट dynamic fare pricing पद्धतीने असल्याने लवकरात लवकर नावनोंदणी करावी.

२. रक्कम शक्यतो रोखीने किंवा बेअरर चेकने जमा करावी.

३. सहलीची पूर्ण रूपरेषा सहलीच्या १५ दिवस आधी get together आयोजित करून सर्वांना दिली जाईल.

४. सदर सहल खर्चात बसप्रवास, वास्तव्य खर्च, नाश्ता, जेवण, सर्व प्रकारच्या एन्ट्री फी व इतर खर्च समाविष्ट आहे.

अधिक माहितीसाठी संस्थेच्या कार्यालयात किंवा **अनिरुद्ध शेंबेकर (८०९७०२८७४९)** यांच्याशी सम्पर्क साधावा.

**कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली**

# सिंधुदुर्ग जिल्हा कऱ्हाडे ब्राह्मण संघ,
## झाशीची राणी जयंती उत्सव

**झाशीची राणी जयंती उत्सव**

दिनांक २४/१२/२०१८ रोजी श्री स्वामी



समर्थ मंगल कार्यालय, देवगड येथे संपन्न झाला. सकाळी १० वाजता कार्यक्रम सुरू झाला. प्रारंभी जिल्हाध्यक्ष श्री. प्रदीप जोशी यांनी दीपप्रज्वलन व झाशीची राणी फोटोपूजन केले. प्रमुख वक्ते श्री. पद्माकर जोशी (देवगड), सत्कारमूर्ती सौ. श्रुती बोंडाळे (कुणकेश्वर सरपंच), श्री. संजय बोंडाले, कविवर्य श्री. प्रमोद जोशी व अन्य सर्व मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. प्रमुख वक्ते श्री. पद्माकर जोशी यांनी राणी लक्ष्मीबाईंचा जीवनपट उलगडून दाखविला. शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कारमूर्तींचा सत्कार करण्यात आला. त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रात देशभक्तिपर गीत, भावगीत व नाट्यगीत यांचे सादरीकरण झाले. यामध्ये श्री. प्रसाद शेवडे (हार्मोनियम व गायन), श्री. विलास ठाकूर, श्री. दत्तात्रय किरकिरे, श्री. विलास गोठोसकर, श्रीम. सावनी शेवडे यांनी आपापली गीते सादर केली. श्री. विद्याधर ठाकूर (व्हायोलिन), श्री. प्रथमेश बोंडाळे व श्री. सचिन लळित (तबला), श्री. तेजस प्रभुदेसाई (झांज) अशांच्या त्या-त्या कला सादर झाल्या. त्यामुळे वेगळी रंगत आली. सूत्रसंचालन श्री. संजय कात्रे यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शन श्री. बाळा धुपकर यांनी केले. सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर कार्यक्रम संपला. सदरहू कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री. उदय प्रभुदेसाई व श्री. बाळा धुपकर यांनी परिश्रम घेतले.

**महिलादिन समारंभ उत्सव**

दिनांक ८ मार्च २०१९ रोजी महिलागुणविशेष व आठवणीतली गाणी हा



स्थानिक कलाकारांचा कर्यक्रम श्री. बाळू कशाळीकर यांचे धनश्री मंगल कार्यालय, भटवाडी, सावंतवाडी येथे साजरा झाला. प्रमुख पाहुण्या सौ. मधुरा आठलेकर (उद्योजिका-वेंगुर्ला) उपस्थित होत्या. विशेष उपस्थिती श्री. सतीश शेजवलकर (जिल्हा उपाध्यक्ष) सचिव श्री. विनायक उमर्ये, खजिनदार श्री. सुधाकर देवस्थळी यांनी दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात केली. श्री. शेजवलकर यांनी कार्यक्रमाचा उद्देश व्यक्त केला. सौ. अनुजा भागवत यांनी महिलादिनाचे महत्त्व विशद केले. सौ. मधुरा आठलेकर यानी 'महिलांचे आरोग्य' यावर विचार व्यक्त केले. तसेच स्वतःच्या छोट्याशा उद्योगाची वाटचाल याबाबतही विवेचन केले. थंडगार पन्हे घेऊन प्रथम सत्र सुरू झाले. यामध्ये महिला व बालिका यांचे विविध गुणदर्शन सादर झाले. यात नृत्यासाठी कु. आरोही देऊसकर, कु. निधी सातापाळेकर, कु. आर्या ठाकूर, कु. सान्वी साधले, कु. दीक्षा उपाध्ये यांनी भाग घेतला. कु. ऋतुजा देऊसकर हिने 'ती फुलराणी' हा एकपात्री नाट्यप्रयोग, कुमार ऋग्वेद देऊसकर याने 'लाठीमार' ही कला सादर केली. सौ. मंजिरी मुंडले यांनी स्वरचित कवितागायन केले.

कोलगाव ब्राह्मण मंडळाने 'फुगडी' ही लोककला सादर केली. श्रीम. सुमन माईणकर यांचा पुष्प व मिठाई देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.

अल्पोपाहारानंतर 'आठवणीतली गाणी' सादर झाली. गायक कलाकार - सौ. मंजिरी धोपेश्वरकर, कु. अथर्व पित्रे, कु. रेवा पित्रे, कु. आकांक्षा भागवत, कु. ऐश्वर्या माईणकर, कु. साक्षी शेवडे, सौ. अनला मोघे, सौ. भाग्यश्री कशाळीकर, कु. ऋचा कशाळीकर, श्री. अरुण सरवटे, श्री. उदय प्रभुदेसाई तबला साथ- श्री. विजय भागवत, संवादिनी साथ- श्री. चंद्रकांत घाटे यांनी केली.

यामध्ये भावगीत, बंदिश, नाट्यगीत, गवळण, भजन, इ. प्रकार अंतर्भूत होते. प्रथम सूत्रसंचालन सौ. संप्रती कशाळीकर, सौ. अपूर्वा माईणकर यांनी तर द्वितीय सत्राचे संचालन कु. ऋचा कशाळीकर व कु. प्राजक्ता ढोरे यांनी केले. आभारप्रदर्शन सौ. नीलम जोशी यांनी केले. १०६ रसिकांनी उपस्थिती दर्शविली. उत्साहात व कौटुंबिक स्वरूपात कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमस्थळी लघुउद्योजिका सौ. प्रज्ञा मणेरीकर व सौ. सुजाता सप्रे यांनी वस्तू प्रदर्शन व विक्री कक्ष उभारला. सौ. सानिका मुंडले यांची संस्कारभारती रांगोळी विशेष आकर्षण ठरले. कार्यक्रमाच्या प्रायोजक सौ. वैशाली सप्रे, सौ. अंजली आठलेकर, सौ. सुवर्णा प्रभुदेसाई, सौ. मुग्धा सातावळेकर, सौ. सुचिता उपाध्ये, सौ. प्रणाली साधले, श्रीम. सुलभा कळशीकर या होत्या.

**प्रेषक - सचिव श्री. उमर्ये**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सोलापूर झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाई गौरव दिन

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या सूचनेनुसार दिनांक १९ नोव्हेंबर हा दिवस (झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांचा जन्मदिन) कऱ्हाडे गौरवदिन म्हणून साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून येथील सुरजाबाई रामलाल (सेवासदन) मुलींची प्रशाला येथे मुलींसाठी (इयत्ता ५ वी ६ वी मधील) विविध खेळांचे आयोजन केले होते, तर इयत्ता ७ वी मधील मुलींसाठी 'महाराणी लक्ष्मीबाई' यांच्या जीवनशी चरित्रासंबंधी एक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०१९ रोजी प्रशालेच्या प्रांगणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येथील सोलापूर जनता सहकारी बँकेच्या माजी संचालक सौ. सविता लळित या होत्या. कार्यक्रमासाठी सेवादत्त संस्थेचे सचिव श्री. केदार केसकर, उपमुख्याध्यापक श्री. राठोड, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थिनीं उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात सौ. सारिका आठल्ये यांनी गायिलेल्या 'जय शारदे वागेश्वरी' या शारद स्तवनाने झाली. यानंतर कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे अध्यक्ष श्री. श्रीकांत माईणकर यांनी संघाचा परिचय दिला व संघातर्फे श्री. केदार केसकर यांच्या हस्ते श्री. राठोड यांचा सत्कार केला. त्यानंतर प्रशालेतर्फे श्री. श्रीकांत माईणकर व महाराणी लक्ष्मीबाई महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती माधवीताई भाटवेडकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर महिला मंडळाच्या सदस्या सौ. सप्रे यांनी झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांच्या कार्याचा परिचय करून दिला. या गौरवदिनानिमित्त सेवासदन प्रालेतील इयत्ता ५वी व ६वी मधील विद्यार्थिनींच्या क्रीडास्पर्धा, तर इयत्ता ७वी मधील विद्यार्थिनींची झाशीच्या राणीसंबंधी निबंध स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये पुढील विद्यार्थिनींनी यश संपादन केले.

**१. क्रीडा स्पर्धा**

**इयत्ता ५वी** प्रथम क्रमांक : कु. अनन्या र. रणपिसे

**द्वितीय क्रमांक** : कु. प्रगती प्र. गायकवाड,

**इयत्ता ६वी–** प्रथम क्रमांक कु. श्रावणी शाहीर चौगुले,

द्वितीय क्रमांक– कु. श्रावणी अमोल माने

**२. निबंध स्पर्धा इयत्ता ७वी–**

प्रथम क्रमांक कु. कीर्ति भ. गायकवाड,

द्वितीय क्रमांक– कु. प्रतिभा ज्ञा. लांबतुरे,

उत्तेजनार्थ– कु. रिया किरण सोनकांबळे

वरील सर्व यशस्वी स्पर्धकांना रोख बक्षिसे कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे प्रशस्तिपत्रक व झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांचे चरित्र असलेले पुस्तक भेट म्हणून देण्यात आले.


या सर्व कार्यक्रमासाठी प्रशालेने जे सहकार्य केले. त्याबद्दल कृतज्ञता व संघाची आठवण म्हणून संघातर्फे झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाई मोठी फोटो प्रतिमा संघाचे अध्यक्ष श्रीकांत माईणकर यांचे हस्ते प्रशालेस भेट म्हणून देण्यात आली. ही भेट प्रशालेतर्फे संस्थेचे सचिव श्री. केदार केसकर यांनी स्वीकारली. नंतर सौ. सुनीता गोवित्रीकर यांनी आभारप्रदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अंजली माईणकर यांनी केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन सौ. तृप्ती माईणकर यांनी केले होते. शेवटी कऱ्हाडे ब्राह्मण संघ व सेवासदन प्रशालेतील मान्यवर शिक्षक व विद्यार्थिनी यांच्यातर्फे पुलवामा येथील बॉम्बच्या हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रम समाप्त करण्यात आला.

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सोलापूर**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे, वासंतिक उत्सव


कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे यांचा वासंतिक कार्यक्रम शनिवार, दि. ०४ मे २०१९ रोजी सायंकाळी ५.३० ते ८.३० या वेळेत कोथरूड येथील पुण्याई हॉलमध्ये दिमाखात साजरा झाला. वासंतिक कार्यक्रमामध्ये स्त्रियांचे स्वागत हळद–कुंकू व गजरे देऊन करण्यात आले. सर्वांसाठी पन्हे आणि कैरीची डाळ ठेवण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरुवात 'सूरसखी' प्रस्तुत 'कजरा मोहब्बतवाला' या कार्यक्रमाने झाली. 'गाणी दोघींची–आवड सगळ्यांची' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात निर्मिती, संकल्पना, गायक, वादक सर्वच महिला होत्या. या कार्यक्रमाची निर्मिती मानिनी गुर्जर यांची असून संकल्पना रंजना काळे यांची आहे. कार्यक्रमाचे निवेदनही त्यांनीच केले. गायनासाठी मानिनी गुर्जर यांच्यासोबत अनुराधा पटवर्धन व देवयानी सहस्रबुद्धे या होत्या. वादनाची साथ किमया काणे, संपदा खरे–देशपांडे, भावना टिकले, शिल्पा आमटे, उमा जटार, उर्मिला भालेराव यांनी केली. कार्यक्रमात सादर



होणाऱ्या 'ओ चाँद जहाँ वो जाए, अपलम चपलम, तेरी मेहफिल में, कजरा मोहब्बतवाला ' या आणि इतर गाण्यांचा अस्वाद घेताना श्रोते स्मरणरंजनात रमले होते. स्त्री युगलगीतांच्या दालनातील सुरीली सफरीने श्रोत्यांना मनमुराद आनंद दिला. कार्यक्रमानंतर या सर्व सूरसख्यांचा महिला आघाडीच्या वैशाली वर्णेकर आणि मुक्ता चांदोरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यानंतर व्यवसायातून आपल्या ज्ञातीबांधवास केलेली मदत व प्रोत्साहन याची नोंद घेऊन पुणे संघातर्फे पितांबरीचे कार्यकारी व्यवस्थापक श्री. रवींद्र

प्रभुदेसाई, काटदरे मसालेचे अध्यक्ष श्री. अनिल काटदरे यांचा 'उद्योगरत्न' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांचा सत्कार श्री. मकरंद फणसळकर यांच्या हस्ते व श्री. अनिल काटदरे यांचा सत्कार श्री. लक्ष्मीकांत देसाई यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर वैशाली वर्णेकर यांनी सत्कारार्थींची मुलाखत घेतली. या मुलाखतीमध्ये श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांच्यासह त्यांचे सुपुत्र व पितांबरीचे मार्केटिंग डायरेक्टर श्री. परीक्षित प्रभुदेसाई हेसुद्धा सहभागी झाले होते. मुलांना व्यवसायात सहभागी करून घेतल्यावर त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. मुलांच्या कल्पना समजून घेतल्या पाहिजेत. त्यांना सतत नकार देता कामा नये. आपण मोठे असून आपलेच खरे आहे असे नसून, या मुलांच्या कल्पना आपल्यापेक्षा वेगळ्या असून अधिक चांगल्या असू शकतात, हे समजून घेतलं पाहिजे, अशी मते दोन्ही सत्कारार्थींनी मांडली.



कार्यक्रमाची सांगता मानिनी गुर्जर यांच्या पसायदानाने झाली. त्यापूर्वी



श्री. अमित शहाणे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मेघा नाटेकर यांनी केले. कार्यक्रमानंतर पुण्याई सभागृहाचे गजानन पाध्ये यांच्या श्रीवल्लभ केटरर्सचा आम्रखंड-पुरीचा सुग्रास बेत आयोजिला होता. कार्यक्रमाला रसिकांची प्रचंड दाद मिळाली.

**श्री. लक्ष्मीकांत देसाई**
**अध्यक्ष, क.ब्रा. संघ, पुणे**

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ व राष्ट्रसेविका समिती, नागपूर

कऱ्हाडे ब्राह्मण संघ व राष्ट्रसेविका समिती, देवी अहिल्या मंदिर नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक



१८/०६/२०१९ रोजी झांशीची महाराणी लक्ष्मीबाई पुण्यतिथी कार्यक्रम राणी झांशी चौक सिताबर्डी, नागपूर येथे सकाळी ७ वाजता संपन्न झाला. राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळ्यास सचिव श्री. माईणकर



यांनी माल्यार्पण केले. याप्रसंगी रा. से. समितीच्या श्रीमती चित्राताई जोशी यांनी उद्बोधनपर मार्गदर्शन केले. तसेच समितीच्या उपस्थित सेविकांनी स्फूर्तीगीते सादर केली.

याप्रसंगी क. ब्रा. संघ नागपूर चे सचिव श्रीरंग माईणकर, श्री. पळसुले, श्री. खानवलकर, श्री. नवाथे, सौ. नेहा लघाटे तसेच सौ. सुफला ताटवे उपस्थित होते.

**श्रीरंग माईणकर, सचिव**

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई
### चैत्रगौर वासंतिक हळदी-कुंकू समारंभ

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई यांचा चैत्रगौर वासंतिक हळदी-कुंकू समारंभ संघाच्या कार्यालयात दि. १० एप्रिल २०१९ रोजी संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत संपन्न झाला.

आपल्या दैनंदिन जीवनातून वेळ काढून संघातील कार्यालयात विचारांची देवाण-घेवाण आणि मैत्रिणींशी संवाद साधता यावा, या हेतूने उपरोक्त संघ सदैव महिलांना वाव देत असतो, जेणेकरुन संघाची जास्तीत जास्त माहिती ज्ञातीतील मंडळींना व्हावी. हा हेतू साध्य व्हावा या विचारांनी वेगवेगळे कार्यक्रम राबवितात. त्यातील हा एक कार्यक्रम.

चैत्रगौरीची सजावट संघातील सभासद व कार्यकारिणी महिलांनी केली. आंबा-डाळ, कैरीपन्हे, खिरापतीचा नैवेद्य गौरीला दाखविला. त्याची व्यवस्था सौ. नेहा पोखरणकर यांनी उत्तमरीत्या केली होती.

संघाचे सर्व कार्यकर्ते व लक्षणीय महिलावर्ग ह्यांनी आंबेडाळ, पन्हे यांचा आस्वाद घेत खेळीमेळीच्या वातावरणात चैत्रगौर वासंतिक हळदी-कुंकू समारंभ पार पडला.

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई**

# सिंधुदुर्ग जिल्हा कऱ्हाडे ब्राह्मण, संघ लघुपट फिल्म फेअर पुरस्कार २०१९

श्री. अमित विलास पाध्ये यांनी संगीत पार्श्वभूमी दिलेल्या 'द सॉकर सिटी' या लघुपटाला 'लघुपट फिल्मफेअर पुरस्कार-२०१९'प्राप्त.

श्री. अमित पाध्ये हे जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथील असून सध्या जोगेश्वरी येथे वास्तव्यास आहेत. गेली ९ वर्षे हार्मोनियमवादक आणि संगीत संयोजक (Music Arranger) म्हणून कार्यरत. संगीतक्षेत्रातील उगवता तारा म्हणणे सयुक्तीक ठरेल. हार्मोनियमशिक्षण प. तुळशीदास बोरकर (पद्मश्री), डॉ. भा. वा. आठवले व सध्या सुप्रसिद्ध वादक श्री. आदित्य ओक यांचेकडे चालू आहे.

'उंच माझा झोका' व 'राधा ही बावरी' या मालिकेपासून संगीत संयोजक म्हणून काम सुरू केले. नंतर कमला, लक्ष्य, हृदयी प्रीत जागते, कट्टी बट्टी या मालिकासाठी काम केले.

संगीत रंगभूमीसाठी 'एकच प्याला, वस्त्रहरण, नांदी, पती गेले ग काठेवाडी' यासाठी साथसंगत केली आहे. नाटक सं. देवबाभळी' यासाठी संगीत दिले आहे.

मराठी चित्रपट : राजा शिवछत्रपतीपासून काम करायला सुरुवात करून नंतर 'व्हॉट अबाऊट सावरकर', 'उबंटू, बॉईज, बायस्कोप, गोट्या, डॉ. काशिनाथ घाणेकर, कट्यार काळजांत घुसली, भाई व्यक्ती की वल्ली, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध' या सर्वांसाठी संगीत संयोजन केले आहे. विशेष म्हणजे 'भाई' चित्रपटामध्ये पुलंनी वाजवलेली हार्मोनियम दिसते व ऐकू येते ती अमित यांनीच वाजवली आहे.

हिंदी चित्रपटसृष्टी-'मुल्क' आणि 'नमस्ते लंडन' यासाठी हार्मोनियमवादन केले आहे.

दिग्गज कलाकारांना साथसंगत : रामदास कामत, अरविंद पिळगावकर, रघुनंदन पणशीकर, राहुल देशपांडे, महेश काळे यांना साथसंगत केली आहे.

पद्मश्री शंकर महादेवन यांचबरोबर कृष्णा सबरंग, बैठक टू बॉलिवूड, कट्यार टू कजारारे, शंकर महादेवन लाइव्ह कॉन्सर्ट यामध्ये देश-विदेशात साथसंगत. शंकर महादेवन व उस्ताद झाकीर हुसेन यांचेबरोबर इतिहास या कार्यक्रमामध्ये साथसंगत केली आहे.


लघुपट 'फॉरेव्हर व्हीम' साठी ऑस्ट्रेलिया येथे बेस्ट ओरिजनल स्कोरचा पुरस्कार मिळाला असून अमित पाध्ये हे सन २०१८ चे सर्वाधिक ३९ पुरस्कार विजेते आहेत.

**प्रेषक - सचिव श्री. उमर्ये**

---

पुणे पोलीस आयुक्त डॉ .के. व्यंकटेशम् व अन्य वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सारसबाग सिद्धिविनायक मंदिरास ८ जून रोजी सकाळी अनौपचारिक भेट दिली. त्या वेळी संस्थानचे विश्वस्त सुधीर पंडित यांनी त्यांचे स्वागत केले.

**श्री. गणेश गुर्जर**





---

# तबला - एक शिकवण

अमित शहाणे
+९१ ९९२२९ ०७०६८

लहानपणी म्हणजे साधारण सहावी-सातवीत असताना तबला शिकायला जात होतो. जात होतो म्हणजे, घरातल्या डब्यांना वाजवून-वाजवून पोचे आल्यामुळे घरातल्यांनी शिकायला पाठवले, असं म्हणायला हरकत नाही. पारखी सर म्हणून शिकवायला होते, आमच्यापेक्षा थोडेच मोठे होते, पण छान शिकवायचे. खूप शिकलो नाही, म्हणजे आजकालचं शिकायचं परिमाण घेतलं, तर दोन परीक्षा दिल्या. नंतर थोडीफार साथ संगत केली, पण आज मात्र तबला हा माझा भूतकाळ झाला आहे. असं असलं तरी ह्या तबल्याने आयुष्यात खूप शिकवलं.

**तबला-डग्गा :** खरं तर तबला-डग्गा असे दोन भाग असले तरी म्हणताना आपण तबला असंच म्हणतो. वास्तविक बघता तबल्यापेक्षा डग्ग्याला मनगटाचे आणि बोटांचे- दोन्हींचे आघात सोसावे लागतात. डग्गा लावायला पण तसा सोप्पा. तसा त्याला सूर नसला तरी योग्य पद्धतीने लावावा लागतो. अर्थात थोडं हतोडीने ठीक केलं की झालं. काही लोक ह्या डग्याप्रमाणे असतात. त्यांना प्रसिद्धी नको असते, दुसऱ्यांच्या प्रसिद्धीमुळे ते आनंदी होतात. मग प्रसंगी अधिक आघात सोसावे लागले तरी. बऱ्याच वेळा ह्या लोकांचं अस्तित्व ठळकपणे दिसून येत नाही, पण तरी त्याबद्दल त्यांची तक्रार नसते. लोक 'काय तबला वाजवलाय' असंच म्हणतात. खूपच कमी लोक असतात की, त्यांना डग्ग्याच महत्त्व समजतं. मात्र या लोकांची चकाकी कायमच शेवटपर्यंत तशीच राहते. सुराप्रमाणे तबला बदलतो, मात्र डग्गा एकखांबी तंबूप्रमाणे सगळ्यांना सामावून घेतो.

**नेहमीचा तबला :** रोजच्या वापरातल्या तबल्याचं कंफर्ट झोनसारखं असतं. तो असेल तर आपण एकदम रिलॅक्स असतो; मात्र पटकन दुसऱ्याचा तबला दिला, तर आपण थोडे चलबिचल होतो. अशा नवख्या तबल्याला कसं सामावून घेतो आणि ॲडजस्ट होतो, त्यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात.

**चुंबळ :** चुंबळ कायम मला गुरू किंवा आई-वडिलांप्रमाणे वाटते. सगळा भार आपल्यावर घेऊन तबल्याच्या तोल जाणार नाही ह्याची काळजी घेत असते. एखाद्या वेळी थोडा वेळ चुंबळ नसेल तरी चालू शकतं, पण मोठ्या कार्यक्रमात त्याची गरज असतेच. आणि त्याचमुळे तबला लावताना आपण चुंबळवरून तो बाजूला काढतो आणि मग हातोडीने लावतो. ह्याच पद्धतीने गुरूला किंवा आई-वडिलांना मान दिला आणि कमी कष्ट किंवा आघात दिले, तर त्यांची साथ कायम लाभते.

**वादी :** वादी ही आपल्या जवळच्या लोकांप्रमाणे वाटते. तुम्ही सुरात असावं म्हणून कायमच त्यांची धडपड असते आणि त्याचं प्रेशर ते घेतात. मात्र गरजेपेक्षा किंवा चुकीच्या ठिकाणी वादी ताणली गेली, तर तुटू शकते ह्याची मात्र काळजी घ्यावी लागते.

असो. तर एकुणात काय- तुमचा तबला सुरात वाजतोय ह्या घमेंडीत राहू नका; ह्या सगळ्यांची साथ आहे म्हणूनच तो सुरात वाजतोय ह्याची जाणीव तेव्हा म्हणजे झालं.


WWW.2FACTOR.IN
Promote Your Business
Acquire New Customers
Deepen Customer Relationship
BULK SMS
marketing
12%
of facebook posts are read
29%
of tweets are read
31%
of emails are opened
98%
of text messages are read
CHECKED
150
TIMES A DAY
The average person looks at their phone 150 times a day
MOBILE ADS
75%
of people prefer receiving marketing messages via SMS
15%
prefer receiving email ads
10%
prefer in-app or push ads
Solv Technologies
2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park,
Lower Parel, Mumbai 400013
www.2Factor.in
95-5459-5459

# गणितानंद कापरेकर

अश्विनी रानडे
मो. : ८३९०२ ९००४५

द. रा. कापरेकर हे श्रीनिवास रामानुजन् यांच्यानंतरचे जागतिक कीर्तीचे गणितज्ज्ञ. ते मराठी आहेत याचा महाराष्ट्राला अभिमान वाटतो. त्यांचा जन्म १७ जानेवारी १९०५ ला डहाणूत झाला. ते नाशिकजवळच्या देवळाली येथे शिक्षक होते आणि १९६२मध्ये निवृत्त झाले. त्यांना त्यांच्या महाविद्यालयीन काळात गणितातील रँग्लर परांजपे पारितोषिक मिळाले होते. त्यांची राहणी साधी होती. धोतर, कोट, टोपी हा त्यांचा नित्याचा वेश. कापरेकर यांचा गणितातील आकड्यांशी खेळ नोकरीच्या काळात आणि निवृत्तीनंतरही चालूच होता. त्यांना गणिताचा छंद होता, असेच म्हणावे लागेल. त्यासाठी नोकरीच्या काळात त्यांची हेटाळणी होत असे, पण त्यांचे नाव त्याच छंदामुळे जगभर गाजले.

दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर यांनी केलेल्या कामावर विद्यापीठांमध्ये संशोधन चालू असते. शून्याची देणगी भारतीयांनी जगाला दिली; त्याच तोडीची कामगिरी कापरेकर स्थिरांकाची आणि कापरेकर नंबरची आणि त्यांच्या अन्य कामांची आहे. कापरेकर सर देशात काय, नाशकातही फारसे कोणाला माहीत नसतील. भाड्याचे दोन रुपये त्यांच्याकडे नसताना ते टांग्यात बसले म्हणून टांगेवालाही म्हणे सरांशी हुज्जत घालायचा, तेही त्यांच्या उतारवयात!

त्यांनी दोन्ही बाजूंनी वाचले तरी तोच मजकूर येतो अशा इंग्रजी, मराठी, हिंदी इत्यादी शब्दांचे प्रदर्शन भरवले गेले होते. उदा. डालडा, काजु भाजु का?

त्यांना त्याच कल्पनेवरून कदाचित पलिण्ड्रोमिक संख्यांची कल्पना सुचली असावी. त्यांना आगगाडी स्टेशनवर किती वेळ थांबते हे एकदा कोणी विचारले असता, त्यांनी अगदी गमतीदार उत्तर दिले होते....

टूटुटूटु - टू - टू!

समोरचा माणूस गोंधळून गेला होता. तेव्हा त्यांनी त्याला समजावले... Two to Two to Two two म्हणजेच दोनला दोन मिनिटांपासून दोन वाजून दोन मिनिटांपर्यंत अशी चार मिनिटे गाडी थांबते.

कापरेकर स्थिरांक अर्थात Kaparekar constant

६१७४ या चार अंकी संख्येतील आकड्यांची उलटापालट केल्यास, चोवीस चार अंकी संख्या मिळतात. त्यातील कोणत्याही एका संख्येतील अंक चढत्या व उतरत्या क्रमाने मांडले आणि मोठ्या संख्येतून लहान संख्या वजा केली तर उत्तर ६१७४ असेच येते, हे कापरेकर यांनी दाखवून दिले. उदाहरणार्थ- ७६४१ ही संख्या उलटच्या क्रमाने लिहिल्यास १४६७ अशी येईल आणि ७६४१ व १४६७ यांची वजाबाकी ६१७४ अशी येते. मार्टिन गार्टन नावाच्या लेखकाने 'अमेरिकन मॅथेमॅटिकल मंथली'मध्ये त्याची नोंद घेतली आणि कापरेकरांनी शोधलेली ६१७४ ही संख्या 'कापरेकर स्थिरांक' म्हणून मान्य पावली.

त्यांनी स्वतःच्या 'दत्तात्रेय' नावाच्या संख्येचा शोधही लावला. दत्तात्रेत ब्रह्मा, विष्णू, महेश अशा तीन देवता आहेत; तसेच, तीन वर्गदर्शन देणार्या संख्याही गणितात आहेत हे कापरेकर यांनी शोधून काढले. उदाहरणार्थ- ४९ या संख्येत २ चा वर्ग ४ आणि ३ चा वर्ग आहे ९; तसेच, ७ चा वर्ग ४९ हाही अंतर्भूत आहे.

कापरेकर यांनी शोधलेल्या 'दत्तात्रेय' संख्या म्हणजे नक्की काय?

**दत्तात्रेय संख्या**

१३, ५७, १६०२, ४०२०४ या संख्यांना दत्तात्रेय संख्या म्हणतात. कारण, त्या संख्यांच्या वर्गाचे दोन किंवा अधिक हिस्से केले, तर त्यांतील प्रत्येक हिस्सा हा पूर्ण वर्ग असतो.

उदाहरणार्थ- $१३^2$=१६९.(१६ आणि ९ हे पूर्ण वर्ग आहेत.)

$५७^2$=३२४।९;

$१६०२^2$=२५६।६४।०४;

$४०२०४^2$=१६।१६।३६।१६।१६

**कापरेकर आणि कोपर्निकस**

कापरेकर यांच्या काळात प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ कोपर्निकस यांची ५००वी जयंती १९ फेब्रुवारी १९७३ रोजी झाली. खगोलशास्त्र हाही कापरेकर यांचा आवडता विषय होता आणि कोपर्निकस हा त्यांचा आवडता खगोलशास्त्रज्ञ... मग काय विचारता! त्यांनी त्यांच्या आवडत्या खगोलशास्त्रज्ञाला गणिताच्या माध्यमातून वेगळ्याच पद्धतीने आदरांजली वाहिली. त्याच्या जन्मतारखेवरून जादूचा असा एक चौरस बनवला की- त्यातील उभी, आडवी, तिरपी किंवा कोणत्याही सिमेट्रीने बेरीज एकसारखीच म्हणजे ५९४ येईल...

१९ २ ७३ ५००
५०१ ७२ ५ १६
३ १८ ४९९ ७४
७१ ५०२ १७४

या जादूच्या चौरसात ५९४ ही बेरीज तब्बल २२ वेगवेगळ्या पद्धतींनी मिळवता येते. त्या चौरसातील पहिली ओळ आहे १९ २ ७३ ५०० म्हणजे कोपर्निकसची जन्मतारीख आणि त्यांनी

साजरी केलेली ५०० वी जयंती!

**कापरेकर आणि त्यांची गुरुदक्षिणा**

रँग्लर परांजपे हे कापरेकर यांचे फर्ग्युसन कॉलेजातील प्राध्यापक होते. त्यांच्या शहाऐंशीव्या जन्मदिवसानिमित्त (१६-२-६२) कापरेकर यांनी त्यांच्या गुरूसाठी तब्बल पाच संख्यांचा चौरस बनवला.

१६ ०२ १९ ६२ ८६
०१ ६७ ९१ २१ ०७
९६ २६ १२ ०४ ४७
१७ ०९ ५२ ७६ ३१
५७ ८१ ११ २२ १४

योगायोग म्हणजे, त्या घटनेनंतर त्यांना विद्यापीठ अनुदान मंडळाची शिष्यवृत्ती मिळाली.

कापरेकर यांची अजब आकडेमोड – एक नमुना

४ २ ० ४ २ ३ ४ १ २ ५ आणि ५ २ १ ४ ३ २ ४ ० २ ४ या पालीण्ड्रोम संख्या आहेत; म्हणजे त्या उलटसुलट कशाही लिहिल्या तरी एकच संख्या मिळते. त्या पुढीलप्रमाणे मांडल्या......

त्यांची पुनर्मांडणी करू या.

४, २०, ४२, ३, ४१, २५ आणि ५, २१, ४३, २, ४०, २४

आता,

४ + २० + ४२ + ३ + ४१+ २५ = ५ + २१+ ४३ + ४० + २४

आणखी गंमत पाहा. या सर्व संख्यांचे वर्ग केले आणि मिळवले तरीही........

$$४^{2}+२०^{2}+४२^{2}+३^{2}+४१^{2}+२५^{2}=५^{2}+२१^{2}+४३^{2}+४०^{2}+२४^{2}$$

आणखी गंमत पुढेच आहे.

यांचा घन केला असताही दोन्ही बाजू सारख्या राहतात. हे कापरेकर यांनी गणित करून काढले होते.

$$४^{3}+२०^{3}+४२^{3}+३^{3}+४१^{3}+२५^{3}=५^{3}+२१^{3}+४३^{3}+४०^{3}+२४^{3}$$

ही आकडेमोड कॅलक्यूलेटरवर सुद्धा करणे वेळ खाणारे काम आहे आणि त्या वेळी कॅलक्युलेटर वगैरे नसतानाही छाती दडपून टाकणारी ती आकडेमोड कापरेकर यांनी फक्त कागद-पेन्सील घेऊन केली होती!

बहुतेक कॅल्क्युलेटर हे दहा किंवा बारा डिजिटचे असतात; तर कापरेकर यांनी इतके गुणाकार-भागाकार करण्यासाठी किती वेळ खर्च केला असेल आणि तेही अत्यंत अचूकपणे व कंटाळा न करता..... म्हणूनच त्यांचे नाव प्रख्यात गणितज्ञ म्हणून 'द वर्ल्ड डिरेक्टरी ऑफ मॅथेमॅटिशियन' या स्वीडनहून प्रकाशित झालेल्या ग्रंथात समाविष्ट झालेले आहे.



# यशोगाथा : श्री. गजानन पाध्ये

शब्दांकन : सौ. मेघा नाटेकर
मो. : ९६३७१ ५५९४८

नमस्कार, पुण्यातल्या बहुतेकांना मी कोण ते माहीत आहे! कारण कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे यांचे बहुतेक सगळे कार्यक्रम आमच्या इथेच होतात. तर, मी – गजानन पाध्ये, पुण्याई हॉलवाले. ह्या व्यवसायात मी गेली १० वर्षे आहे. 'श्रीवल्लभ केटरर्स' या नावाने आम्ही काम करतो. केवळ केटरिंगच नाही, तर ग्राहकांच्या मागणी अथवा इच्छेनुसार लागणाऱ्या सर्व सेवा पुरवतो.

सामान्यपणे आजूबाजूला आपण पाहतो. अथवा आपला असा समज असतो की, केटरिंग हा पारंपरागत व्यवसाय आहे. यांच्या घरी आधीपासून हा व्यवसाय सुरू आहे. त्या घरातील मुले तो व्यवसाय सांभाळतात, वाढवतात. नव्याने हा व्यवसाय सुरू करत नाहीत. पण माझं थोडं वेगळं आहे. घराण्यात कोणीही न केलेला व्यवसाय मी सुरू केला. एम.कॉम. झालो. बजाज फायनान्समध्ये अकाऊंटंट म्हणून नोकरीला लागलो. त्यातून ओरिसा, कलकत्ता येथे काम केले.



श्री गजानन पाध्ये



श्री. रोहन गांधी

मी मूळचा राजापूर जिल्ह्यातील पेंडखलेचा. भूगाव, राजापूर, रत्नागिरी येथून शिक्षण पूर्ण केलं. बी. कॉम्. झालो. बी. कॉम्. करतानाच रत्नागिरीत अर्धवेळ (पार्टटाईम) कामदेखील करत होतो. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी म्हणून २००२ मध्ये पुण्यात आलो. सीए/सीएसची तयारी करत असतानाच पुणे विद्यापीठाच्या बहि:स्थ विभातून (external) परीक्षा देऊन नंतर तिथेच माझी नोकरीदेखील कायम (permanant) झाली. पण पोस्टिंग पुन्हा ओरिसा ऑफिसला होतं. म्हणून ती नोकरी सोडून मी पुण्यात पुण्याई हॉलला मॅनेजर ह्या पदावर रुजू झालो. त्या वेळी इथे माझ्या आतेभावाचेच केटरिंग होते. २००४-२००९ पर्यंत मॅनेजर म्हणून काम करताना व्यवसाय अगदी जवळून पाहिला होता. त्यातल्या खाचाखोचा चांगल्या लक्षात आल्या होत्या. त्यामुळे या कामाची आवडही हळूहळू निर्माण झाली आणि वाढत गेली. त्यामुळे आपणही स्वत:चे असं काही तरी करावं, असं वाटू लागलं. त्या वेळी २-३ पर्याय समोर होते. त्याच वेळी माझं लग्नही झालं होतं. माझी पत्नी राजापूर हायस्कूलला प्रायमरीला शिक्षिका होती. तिची नोकरी कायम होती तर मीसुद्धा तिकडे जाऊन शिक्षक व्हावं, असेदेखील सुचवलं गेलं. पण मी विचार केला की– ज्या कामात आपण आपल्या आयुष्याची ५ वर्षे घालवली, ज्याची आपल्याला आवड आहे ते काम सोडून न आवडणारे काम करण्यात काय अर्थ आहे? म्हणून मग मी हा व्यवसाय सुरू करायचं ठरवलं. घरच्यांचा माझ्या व्यवसाय करण्यालाच विरोध. त्यातून केटरिंगच्या कामाला तर खूपच. कारण त्यांच्याच काय, पण सर्वांच्याच डोक्यात केटरिंगच्या व्यवसायाबद्दल एक ग्रह झालेला असतो– केटरिंगचा व्यवसाय करणार म्हणजे कमरेला पंचा गुंडाळून खांद्यावर मोठा झारा घेऊन बल्लवासारखे काम करत फिरायचं. घरच्यांच्या विरोधाचं कारणही हाच ग्रह होता. पण माझ्या पत्नीने मला साथ दिली. तिने मला पूर्ण सहकार्य केले. लग्नानंतर लगेचच मी नोकरी सोडली, तरी तिची राजापूरला नोकरी सुरूच होती. लग्नानंतर सुरुवातीची २-३ वर्षे मी पुण्यात व ती तिकडे राजापुरात. पण तिने कधी त्याबद्दल तक्रार केली नाही.

त्यामुळे केटरिंगच करायचं, असं ठरवलं आणि मी व माझा पार्टनर रोहन गांधी यांनी एकत्र येऊन स्वप्नपूर्ती हॉल, पौड रोड, पुणे येथे काम सुरू केलं. रोहन हादेखील कोकणातलाच, संगमेश्वरचा. आम्ही एकत्रच पुण्यात आलो. मी एम.कॉम्. केले आणि त्याने हॉटेल मॅनेजमेंट. आमच्या दोघांचंही काम एकमेकांना पूरक होतं. त्याची थिअरी आणि माझं प्रॅक्टिकल मिळून 'श्रीवल्लभ केटरर्स'चा जन्म झाला. आणि एका स्वप्नपूर्ती हॉलपासून सुरुवात झालेलं हे रोपटे आता वृक्षाची वाटचाल करत आहे.



स्वप्नपूर्तीसोबतच आज पुण्याई हॉल आहे. MIT कॉलेज कोथरूडच्या मागे १०० मुलींचे हॉस्टेल आहे. बावधन येथे २ बँक्वेट हॉल आहेत. खाली एक रेस्टॉरंट आहे. तसेच कोकणात रत्नागिरीत सिद्धिविनायक हॉलदेखील आहे. त्यानंतर रत्नागिरीत आम्ही पहिल्यांदा महाराष्ट्रीयन थाळी असणारे आणि पूर्ण Veg असे 'मथुरा' नावाने हॉटेल सुरू केलं. तिथेच वर लॉजिंगदेखील सुरू केलं आणि सांगायला आनंद वाटतो की, हॉटेल सुरू झाल्यानंतर पहिल्याच वर्षी रत्नागिरीतील प्रसिद्ध हॉटेलपेक्षा आमच्या हॉटेलला जास्त मागणी होती. नुकताच रत्नागिरीतील मराठा मंदिर हॉलदेखील त्यांनी आमच्याकडे चालवण्यासाठी दिला आहे. जानेवारी २०२० पासून तोदेखील सुरू होईल. अजूनही काही गोष्टी रत्नागिरीत नव्याने सुरू करण्याचा मानस आहे.

आज माझ्याकडे ६-७ ठिकाणचे मोठे काम सुरू आहे. त्यामुळे लोकांना वाटतं की, हे किती नशीबवान आहेत. पण त्याच्यामागे असणारे कष्ट दिसत नाहीत. हा व्यवसायच असा आहे की, हा वरून खूप छान-छान दिसतो तेवढाच तो कष्टकारक पण आहे. या व्यवसायात मोठे आव्हान असतं ते माणसं टिकवणं. आहेत ती माणसं टिकली, तरच तुमचा दर्जासुद्धा तसाच टिकून राहतो. त्यामुळे वेळप्रसंगी घरचं सोडून या कामगारांचं पाहावं लागतं. याबरोबरच आर्थिक ताण असतो तो वेगळाच. प्रामुख्याने ज्या वेळी कार्यक्रम नसतात असा जुलै ते नोव्हेंबरचा काळ.



त्या वेळी योग्य नियोजन करणं महत्त्वाचं असतं. आज रत्नागिरीतील हॉल, हॉटेलला सर्व सामान - भाजी, किराणा इ. पुण्यातून दिला जातो. दर १-२ दिवसाआड मार्केटयार्डमधून आम्ही स्वत: जाऊन माल खरेदी करतो. पहाटे ४.३० ते ६.३० या वेळेतच मार्केटयार्डमध्ये १ नंबरचा माल तुम्हाला मिळू शकतो. त्यामुळे आम्ही दोघेही स्वत: जाऊन माल खरेदी करतो. ह्या सगळ्या कष्टांचीच फळे आज आम्ही चाखत आहोत.

आज आमच्याकडे जेवून गेलेला प्रत्येक जण मला सांगतो- अमुक-अमुकपेक्षा तुमचे जेवण अतिशय उत्तम असतं. त्याचं कारणच हे आहे. तुम्ही १ नंबर माल खरेदी करा, तयार होणारा पदार्थही १ नंबरच होईल. 'मालाशी तडजोड म्हणजे तुमच्या व्यवसायाशी तुम्ही केलेली प्रतारणा.' हे मला कधीच मान्य नाही. हे काम करताना चांगले अनुभव आले तसे काही वाईट अनुभवही आले. लोकांकडून टीकासुद्धा झाली. पण मी प्रत्येक परिस्थितीत शांत राहिलो. कधीच कुणाला प्रत्युत्तर दिलं नाही. मी माझा मार्ग, माझं ध्येय, माझं काम ठरवलं होतं आणि बाकी कशाचाही विचार न करता मी माझ्या मार्गावरून शांतपणे चालत राहिलो.



आज माझ्याकडे १०० पेक्षा अधिक कामगार काम करत आहेत. पण त्यातले ८०% कामगार कोकणातले, माझ्या पंचक्रोशीतले आहेत. त्यातही मी ब्राह्मणांना अधिक प्राधान्य देतो. त्यातून कऱ्हाडे ब्राह्मण असतील तर लगेच नोकरी देतो. आज माझ्याकडे मॅनेजर म्हणून असणाऱ्या १२ लोकांमध्ये ८-९ कऱ्हाडे आहेत. तसेच माझ्याकडे २५-३५ वयोगटातील ब्राह्मणांसाठी- त्यांतही कऱ्हाडे ब्राह्मणांसाठी चांगल्या नोकरीच्या संधी आहेत.

याचबरोबर आज एकमेकांना पूरक व्यवसाय असणाऱ्या व्यावसायिकांनी एकत्र येण्याची गरज आहे. त्यातून व्यवसाय अजून वाढू शकतो. हा व्यवसाय करताना मी माझ्या जातीसाठी काय करू शकतो. हा विचार मात्र पहिल्यांदा डोक्यात ठेवला पाहिजे. व्याप वाढवताना टेक्नॉलॉजी दूर सारता येत नाही. त्यामुळे आम्ही Social Media Marketing सुरू करत आहोत, ज्याद्वारे आपणाला आमच्याबद्दल वेळोवेळी माहिती मिळत राहील.

आज माझे ६-७ ठिकाणी काम सुरू असलं तरी प्रत्येक काम हे माझं पहिलंच काम आणि आपल्याला ते उत्तमच करायचं आहे, ही भावना मनात कायम आहे. त्यामुळे ग्राहकाच्या आवडीचं, उत्तम चव आणि दर्जा असणारं व अधिकाधिक ताजं आणि गरम अन्न देण्याचा आमचा प्रयत्न असतो. त्यामुळे इथे येणारा ग्राहक पुन्हा दुसरीकडे जाणार नाही याची खात्री १००%.

हृदयाची वाट पोटातून जाते असं म्हणतात, ते काही खोटं नाही!!!

# UPI-IT

बोक्या टेकबंडे
bokya.techbandegmail.com

हाय कऱ्हाडेज्!!! कसे आहात सगळे ? नाही, नाही ह्या लेखात आपण उपीटबद्दल नक्कीच बोलणार नाहीयोत. वाचलात का मागचा लेख? आवडला असेल, मदत झाली असेल तर कळवा मला. मागच्या लेखात मीच इ-मेल **ID** दिला नव्हता, मान्य आहे . ह्या वेळी देईन.

तुम्हाला आठवत असेल, पूर्वीच्या काळी इकडून तिकडे पैसे पाठवणे महाकठीण काम असे. त्यात ती सेवा पुरविणाऱ्यालादेखील काही रक्कम द्यावी लागे. पण टेक्नॉलॉजी ह्या सतत बदलणाऱ्या प्रचंड क्रांती केली आणि आपण आज चुटकीसरशी हवे तेव्हा गरजेपुरते पैसे पाठवू शकतो. मोबाईल फोनवरून वापरण्यात येणाऱ्या **UPI** ह्या पद्धतीबद्दल आपण आज माहिती घेणार आहोत. झालंच तर, काही समज-गैरसमज पाहणार आहोत.

UPI म्हणजे Unified Payment Interface अनेक किचकट app च्या तावडीतून ग्राहकांना सोडविण्यासाठी, डायरेक्ट बँकेतून बँकेत पैसे पाठविण्या-साठी आणि कुठलंही app नसताना साध्या बटणवाल्या फोनवरूनदेखील ग्राहकांना पैशांची देवाण-घेवाण करता यावी ह्यासाठी ही सोय करून दिली आहे . तुम्हाला गुगुल पे, फोन पे सारख्या app वर मित्रांकडून बोलावणं करणारे मेसेजे आलेले असतील. जॉईन केल्यावर ५१ रुपये मिळतील वगैरे असंही लिहिलं असेल त्यात आठवलं ना? आता मी जेव्हा UPI app म्हणीन, तेव्हा ह्यातील काही तरी नजरेसमोर आणा.

ह्यापैकी एखादं app डाउनलोड करा, ते तुम्हाला बँक खाते जोडायला सांगेल. तुमची बँक निवडल्यावर तुमच्या फोन नंबरला जोडलेलं खातं शोधेल, तुम्हाला एक ४ आकडी पिन क्रमांक तयार करायला सांगेल, जो तुम्हाला पुढच्या प्रत्येक transaction च्या वेळी वापरायचा आहे .

UPI app वरून पेमेंट/ट्रान्सफर करण्यासाठी तुमच्याकडे खालील पर्याय उपलब्ध आहेत.

१. UPI ID- समोरच्या माणसाचा UPI ID; जो साधारण असा असतो १२३४५६@hdfcbank किंवा kedar.padhye@ybl. तर हा टाकल्यावर verify करताना तुम्हाला या व्यक्तीचं पूर्ण नाव दिसतं आणि आपल्याला कळतं की हीच ती व्यक्ती आहे की नाही.

२. QR कोड- समोरच्या व्यक्तीचा QR कोड आपल्या app मध्ये स्कॅन करून पण त्वरित पैसे देऊ शकता. सध्या अनेक दुकानांत तुम्ही हे चौकोनी कोड पाहिले असतील. त्यामुळे सुट्टे पैसे नसतील तर काळजी नको. दुकानदाराला ह्या मार्गाने आता त्वरित पैसे देऊ शकता.

३. Contact list- तुम्ही वापरत असलेल्या UPI app च्या संपर्क यादीत तेच app वापरणार जी मंडळी असतील, त्यांना त्वरित पैसे पाठवू शकता. त्यांचा UPI ID किंवा इतर कशाचीही गरज न भासता.

४. अकाउंट आणि IFSC क्रमांक- एखाद्या व्यक्तीला कधी तरी पैसे द्यावे लागतात किंवा ती व्यक्ती UPI app वापरत नसेल तर हा उत्तम पर्याय असतो. अकाउंट आणि IFSC क्रमांक मागून घ्यायचा, न चुकवता या app मध्ये टाकायचा आणि देऊन टाकायचे पैसे.

याशिवाय तुम्हाला एखाद्या व्यक्तीला पैसे मागायचे असतील तर Request असा पण पर्याय असतो. तुम्हाला फक्त या व्यक्तीचा UPI ID माहीत हवा. असे पैसे तुम्ही मागितलेत की समोरच्या व्यक्तीला प्रत्येक वेळी app उघडताना ते दिसत राहतं आणि तुमचा UPI ID टाईप न करता त्याने पे म्हटलं की, पैसे तिकडून इकडे!!

आता काही प्रश्नांची उत्तरं देतो.

१. कोणतं app वापरावं ?

– जे जास्त कॅशबॅक देणारं भारतीय app असेल ते. अनेक app अशी आहेत जी तुम्हाला वीज बिल, टेलिफोनचं बिल, मोबाईल फोनचं रिचार्ज, मालमत्ता कर इत्यादी भरण्याची सुविधा देतात; शिवाय काहींना कॅशबॅक मिळतो अकाउंटमध्ये.

२. किती पैसे पाठवू शकतो ?

– तुम्ही UPI app ला जोडलेल्या बँकेप्रमाणे हे बदलतं, पण बऱ्याच बँका एका transaction मध्ये २०,०००रू. आणि एका दिवसात १,००,०००रू. देवाण-घेवाण करू देतात.

३. मी जे app वापरतो, ते समोरचा माणूस वापरत नसेल तर ?

-काही फरक पडत नाही. तुम्ही त्या व्यक्तीचा UPI ID बरोबर टाकला असेल तर ते पैसे त्या व्यक्तीला जातातच. आणि, त्या व्यक्तीचा UPI app मधला QR कोड कोणत्याही इतर UPI app मधून ओळखला जाऊ शकतो.

४. UPI जोडताना काय अडचणी येऊ शकतात ?

तुमचं जे बँक अकाउंट जोडायचं आहे, ते त्या बँकेतील तुमच्या फोन नंबरशी जोडलेलं एकमेव अकाउंट असायला हवं. एखादं joint account पण असेल, त्याला तुमचाच फोन नंबर

जोडलेला आहे; तर UPI app त्याला जोडलं जात नाही. त्यामुळे एक बँक, एक अकाउंट आणि एक फोन नंबर हा फॉर्म्युला लक्षात ठेवा.

५. एकाच व्यक्तीचे वेगवेगळे UPI ID असू शकतात का?

– होय. जर तुम्ही एकंच बँक अकाउंट २ वेगवेगळ्या UPI appला जोडलेलं असेल, तर ती apps तुमचे २ वेगळे UPI ID बनवतात. पैसे शेवटी एकाच अकाउंटला जातील, पण पत्ते वेगवेगळे.

६. कितपत सुरक्षित आहे?

थोडीफार जोखीम सगळीकडेच, सगळ्याच app मध्ये असते की जसं अकाउंटमधून दोनदा पैसे जाणं. पण काळजी करण्याची गरज नाही. कस्टमर केअरला फोन करून सांगितलं की ३-५ दिवसांच्या आत पैसे परत येतात. फार भीती वाटत असेल तर सरळ एक '० balance' अकाउंट उघडा. अनेक बँक्स हल्ली ही सेवा देतात. या अकाउंटला गरजेपुरतेच पैसे ठेवायचे आणि फक्त देवाण-घेवाण करण्यापुरतं ते वापरायचं.

७. ऑनलाईन खरेदीच्या वेळी उपयोग होईल का?

– नक्कीच. पूर्वी आपण डेबिट कार्डचा नंबर वगैरे टाकायचो आणि पेमेंट करायचो, आता त्याऐवजी आपलाच UPI ID टाकायचा. तो टाकला की ज्या UPI apper तो जोडलेला असेल तिथे तुम्हाला दिसेल कि amazon/flipkart ह्यांनी इतके इतके पैसे मागितले आहेत. तिथून ते भरायचे आणि परत आपलं शॉपिंगचं app उघडायचं. झालं काम!

कसं वाटतंय आता? मनातले गुंते सुटलेत का? टेक्नोलॉजीला सावकाश आपलंसं करा, आपलंच आयुष्य सुकर होणार आहे. पैसे पाठवत राहा, मागत राहा. म्हणून म्हणालो, UPI-IT.

अजून काही प्रश्न असतील तर खाली दिलेल्या निरोप (Email) पत्त्यावर जरूर विचारा. पुढील्या लेखासाठी काही विषय असेल डोक्यात, तर तो पण कळवा. YouTube वरील Bokya Techbande channel वरचे व्हिडिओ पण पाहा. तुम्हाला नक्की मदत होईल टेक्नोलॉजी समजून घेण्यासाठी. चला, भेटू!!

## झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा स्मृतिदिन. त्यानिमित्ताने ही काव्यरूपी श्रद्धांजली...

अविनाश मणेरीकर
मो.: ९४२२३ ७९८७८

तांबे कन्या मनकर्णिका होई लक्ष्मी नेवाळकर
गंगाधरपंत पतिदेवांची असे माया तिच्यावर... १

अश्व परीक्षा मल्लखांब अन् असे तलवारबाजी
युद्धनिपुण लक्ष्मी देई लक्ष दरबारी कामकाजी ...२

पतिनिधनानंतर लक्ष्मी हाती घेई राज्यसूत्रे
रक्षण करण्या प्रिय झाशीचे अंगी चढवी सैनिकी वस्त्रे... ३

डलहौसीचे कारस्थान करी खालसा संस्थाने
मांडलिक आंग्लांचे करुनी वागवी तो जुलूमाने ...४

अठराशे सत्तावन्न सनी झाला मोठा उठाव
धैर्यशाली राणीचा असे त्यावरी प्रभाव ...५

वेढा घालून झाशीला चालून आले आंग्लसैन्य
पर्याय नुरे राणीसाठी युद्धावाचोनी दुजा अन्य ...६

राणीची तलवार तळपे भासे नभीची सौदामिनी
'माझी झाशी देणार नाही' गर्जे राणी ती मानिनी... ७

दुष्ट निर्दयी ब्रिटिशांचे वार झेलले राणीने
पाठीवरच्या मुलासवे असे तिचे जगणे अन् मरणे ...८

वीरांगना राणीचा आजि असे स्मृतिदिन
मातृभूच्या वीरकन्येसी करू नित्य वंदन ...९



# वैयक्तिक माहिती भरून देण्यासाठी

आडनाव नाव मधील नाव

संपूर्ण नाव (श्री/ सौ./ श्रीमती) : ----------------------------------------

संपूर्ण पत्ता (जवळील खुणांसहीत): ----------------------------------------

----------------------------------------

दूरध्वनी क्र. : -------------------- व्हॉटस् ॲप : --------------------

ई-मेल आयडी :----------------------------------------

वर्गणी भरल्याची तारीख : ----------------------------------------

वर्गणी रु. : ----------------------------------------

वर्गणी जमा करण्याची पद्धत : ऑनलाईन / कॅश / चेक ----------------------------------------

संघाचे नाव : ----------------------------------------

संपर्क शहर प्रतिनिधीचे नाव : ----------------------------------------

## अभिप्राय

संपूर्ण नाव : ----------------------------------------

संपूर्ण पत्ता : ----------------------------------------

-------------------------------- दूरध्वनी क्र. : --------------------

संघाचे नाव : ----------------------------------------

संपर्क शहर प्रतिनिधीचे नाव : ----------------------------------------

अभिप्राय : ----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

nakhye
UDYOG

AT YOUR SERVICE

NAKHYE'S
ASHOK
SWEETS

ALL TYPES OF MITHAI, BENGALI SWEETS, FARSAN, SNACKS, DRY FRUITS.

M/S. NAKHYE FOODS LLP. Tel - **2482106, 2483476**
• Everest Pride, Kelkar Road, Dombivli (E). Mob.: **86918 99000** • Everest House, Pandit Deendayal Road, Dombivli (W). Mob.: **97026 55000.**
• Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk, Phadke Road, Dombivli (E). Tel: **2433193.** Mob.: **97028 11122.**

**Shubhmangal**
CATERERS & AC HALL

Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk,
Near Railway St., Dombivli (E) - 421201.
Tel: (Hall) **0251 - 2860720, 9702666000**, Fax: **2483351.**
Email: ynakhye@gmail.com
Website: **www.shubhamangalhall.com**

EVEREST
HALL

**AN AIR CONDITIONED HALL**
FOR ALL PROGRAMMES
WITH INDOOR CATERING FACILITY
AND ALL OTHER SERVICES

M. Gandhi Road, Dombivli (west).
Tel.: **9702622000, 9702011131**

EVEREST
DISTRIBUTORS


**DISTRIBUTORS FOR**
Kwality Walls (HUL), Idea Cellular, Tropicana (Pepsico),
Chitale Bandhu Mithaiwale, Mother Dairy

Everest House, Pandit Deendayal Road,
Dombivli (W) - 421202. Maharashtra, India.
Tel: **+91 251- 2483476, 2482106.**
Fax: **+91 251- 2483351.** Email: **anakhye@gmail.com**

finVantage

EQUITY: Derivatives Commodities, DP, IPO,
Mutual Fund, Realty, Life and General Insurance,
PMS and Financial Planning Advisory

M/s. Finvantage Services(P) Ltd.
2nd Floor, Everst House, M. G. Road,
Dombivili (W)-421202. Tel.: **91251 2480305**






# रक्षिता तुम्ही, प्राणांस घेऊनि हाती!



अनुराधा प्रभुदेसाई
संस्थापक, लक्ष्य फाउन्डेशन
zeemarathidisha@dnaindia.net

"आम्ही झोजिला पास ओलांडून द्रासमध्ये दाखल झालो. नक्की कुठे जायचे आहे, काय कारवाई करायची आहे, फारसे काही सांगितले जात नव्हते. वेगवेगळ्या आख्यायिका कानावर येत होत्या. त्या भयावह होत्या निश्चित!" – १३ जॅकरिफचा कारगिल हिरो बोलत असताना आम्हा सर्वांच्या अंगावर काटा आला होता.

कारगिलयुद्धातील एक प्रसंग कथन करताना तो पुढे सांगू लागला, "आम्ही बेसकॅम्पवर आलो. या इथूनच थोड्या अंतरावर तो कॅम्प आणि पुढे २०० मीटरवर एक टेलिफोन बूथ होता. आमच्या आधी पोचलेले फौजी घरी फोन करत होते. १९९९ साल. त्यामुळे घरी कळवण्याचा तोच एक मार्ग होता. आम्ही तिथे पोचलो. सर्व फौजी 'हम ठीक है', 'सबकुछ ठीक है' असा मोघम निरोप घरी देत होते. एक हरियानवी बच्चा मात्र जोशमध्ये येऊन 'सबकुछ चंगा है– लवकर घरी येईन असे तिला सांगा' असे म्हणत मिशीतल्या मिशीत हसत होता. पुढील महिन्यात शादी आहे, म्हणत तो थोडा पुढे गेला मात्र मोठा आवाज आला. मी वळून पाहिले. माझ्या डोळ्यांदेखत त्याच्या ठिकऱ्या उडाल्या. आपल्यासमोर काय वाढून ठेवले आहे याची जाणीव झाली. पाकिस्तानी सैनिकांकडून आमचे जोरदार स्वागत झाले. पहिली गोळी भले त्यांनी झाडली असेल युद्धाचा शेवट मात्र आमच्याच गोळीने झाला."

**वातावरणात नि:शब्द शांतता आणि टाळ्यांचा कडकडाट...**
**स्थळ होतं द्रास येथील पोलो ग्राऊंड, तारीख ७ जुलै २०१९.**

पॉइंट ४८७५ चा विजय दिवस तर कॅप्टन विक्रम बात्रा यांचा हौतात्म्यदिन. कारगिल युद्धात निकराने लढलेल्यांपैकी ६४ जवान आणि अधिकारी कारगिल युद्धात लेफ्टनन्ट-कर्नल असलेले आणि आजच्या घडीला लेफ्टनन्ट-जनरल पदापर्यंत पोहोचलेले अतिविशिष्ट सेवापदक, वीरचक्र, सैनिक सेनापदक यांनी सन्मानित असलेले लेफ्ट. जनरल वाय. के. जोशी यांची लक्षणीय उपस्थिती. सगळेच वीस वर्षांपूर्वी घडलेल्या युद्धाचे साक्षीदार. सर्वांच्या भावना उचंबळून येत होत्या. काही व्यक्त करत होते, तर काहींचा शब्देविना संवाद चालू होता. निमित्त होते 'लक्ष्य फाउंडेशन'तर्फे आयोजित 'मेरा देश मेरी पहचान' कार्यक्रमाचा सांगतासोहळा.

कारगिल युद्धाला २० वर्षे पूर्ण होण्याचे औचित्य साधून ५/६/७ जुलैला बटालिक, काकसर व द्रास या दुर्गम प्रांतांत वरील कार्यक्रम संपन्न झाला. कारगिल युद्धात ज्या ज्या ठिकाणी भारतीय सैनिक लढले आणि शत्रूला चारीमुंड्या चीत करून भारताचा तिरंगा फडकावला त्या ठिकाणी, त्या शिखरांच्या पायथ्याशी सैनिकांचा सन्मान करताना, त्यांचे अनुभव ऐकताना आवेश, रोमांच, थरार, समर्पण, कर्तव्यपालन अशा कित्येक शब्दांचा अर्थ गवसत गेला.

शून्याहून खाली २० अंश तापमान, पाठीवर पंचवीस किलो वजन, शिवाय हातातील युद्धसामुग्रीचेही वजन, १६ ते १७ हजार फूट उंचीचे सरळसोट तर ८० अंशांचे कडे, बर्फांनी आच्छादलेली शिखरे, उंचावर मोक्याच्या ठिकाणी मोठ्या संख्येने बसलेला शत्रू, रात्रीचा मिट्ट काळोख, काडेपेटी पेटवली तरी शत्रूचा स्नायपर मस्तकभेद करण्यास तत्पर. शत्रूच्या तुफान माऱ्यामुळे कोसळणारे, जखमी होणारे साथीदार, तरीही आगेकूच करण्याचा निर्धार आणि पलटणीच्या इज्जतीचा विचार! सगळीच प्रतिकूल परिस्थिती होती. पण भारतीय सैनिकांकडे शाबूत होता तो दुर्दम्य आशावाद! प्रखर राष्ट्रनिष्ठा, असामान्य कर्तृत्व, उच्च मनोबल, अदम्य साहस या गुणांमुळे भारतीय सैन्य लढले. मश्को, द्रास, काकसर आणि बटालिक जवळजवळ १२० किलोमीटरची ही पर्वतरांग, शत्रूने LMG (लाइटमशीनगन) MMG (मीडिअम मशीनगन), UMG (युनिव्हर्सल मशीनगन) स्ट्रिंगर मिसाइल्स, विमान पाडू शकण्याची क्षमता असलेल्या तोफा, वाटेवर पेरलेले अगणित भूसुरुंग! या सर्वांवर मात करत सैनिक लढले एवढेच नव्हे तर विजयी झाले. पण या युद्धाची दाहकता अनुभवताना एकदा काय ते युद्ध करून टाका असे बसल्या जागी म्हणणाऱ्यांना सांगावेसे वाटते की 'युद्ध' हा केवळ अडीच अक्षरी शब्द पण या शब्दाने कित्येक घरे उद्ध्वस्त होतात तर कित्येकांच्या स्वप्नांचा चुराडा होतो. युद्ध म्हणजे रक्तमांसाचा चिखल, असह्य वेदना, आप्तजनांचा विरह!

बटालिक सेक्टरमधील तो भयाण खडकाळ, उभा पहाड! "मॅडमजी मी आणि माझा बडी (साथीदार) एकत्रच सैन्यात दाखल झालो होतो..." १७ गढवालचा कारगिल योद्धा सांगू लागला ... 'गोळी छातीवर घ्यायची पाठीवर नाही, हे आम्ही ठाम ठरवले होते. एकमेकांना इशारे करत मोठ्या शिळांच्या (बोल्डर) आड आसरा घेत आम्ही बरेच वर पोहोचलो. शत्रूच्या तोफगोळ्यांचे आवाज भयभीत करत होते. धैर्य वगैरे ठीक आहे, पण भीतीने थरकाप होत होता, हे सत्य आहे. कोण कुणाच्या गोळ्यांनी मरत होते काहीच कळत नव्हते. पण आम्ही मात्र एकेक इंचाने चढाई करत शत्रूच्या जवळ पोहोचलो. मी एकाचा खात्मा केला. त्यांनी झाडलेली गोळी माझ्या खांद्यात घुसून बाहेर पडली. मी विव्हळलो. आणि माझा बडी धावत आला. पण शत्रूने त्याला टिपले, मॅम तो कोसळला. सरपटत माझ्याजवळ येऊन विचारपूस करू लागला. त्याच्या मानेतून रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. त्या स्थितीतही तो शत्रूवर धावत जाणार होता, पण घात झाला. श्वास कमी कमी होत गेला. मी माझ्या दुखापतीकडे दुर्लक्ष करत त्याला खांद्यावर घेऊन शत्रूला हुलकावण्या देत पहाड उतरू लागलो. तो कानात कुजबुजत होता. त्याचे रक्त, माझे रक्त, सगळे शरीर माखले होते. मी तुझे काम नक्की करेन, असा मी त्याला शब्द दिला. बेसवर आलो, त्याला खाली ठेवले. तेव्हा कळले तो माझ्या पाठीवरच... तो माझ्या कानात काय कुजबुला होता सांगू मॅम? तो म्हणाला होता, 'माझ्या सॅकमध्ये एक डायरी आहे. त्यात दोन नावे आणि फोन नंबर आहेत. मी मेलो तर कृपया त्या व्यक्तींना फोन कर. मी त्यांचे काही देणे लागतो. ते तू दे. मातृभूमीचे उपकार फेडणारा हा सैनिक जाता जाता हेही उपकार फेडून जायला विसरला नाही." आपले अश्रू गालावर ओघळू देत तो खाली बसला आणि आमची अवस्थाही त्यापेक्षा वेगळी नव्हती.



शून्याहून खाली २० अंश तापमान, पाठीवर पंचवीस किलो वजन, शिवाय युद्धसामुग्रीचेही वजन, १६ ते १७ हजार फूट उंचीचे सरळसोट तर ८० अंशांचे कडे, बर्फांनी आच्छादलेली शिखरे, उंचावर मोक्याच्या ठिकाणी मोठ्या संख्येने बसलेला शत्रू, रात्रीचा मिट्ट काळोख... कारगिल युद्धात लढलेल्या शूरसेनानींनी त्या जिवंत युद्धपटाचे प्रसंग शब्दांत उभे केले, तेव्हा सारेजण स्तब्ध झाले होते... प्रत्यक्ष कारगिलभूमीत ऐकलेल्या वीरकथा...




"मी १८ वर्षांचा होतो. खूप भूक लागायची पण खायला काहीच नव्हते. चार दिवसांनी खिचडी वर पोचली. त्याचा दुर्गंध डबा उघडताच नाकात गेला. पण भुकेल्या पोटी तीही आम्ही संपवली." १७ जाटचा हा तगडा बंदा टोलोलिंगच्या लढ्याचे अनुभव सांगत असताना आमचेही हृदय पिळवटून गेले. तो पुढे सांगू लागला, "आम्ही होतो त्या पहाडावर बर्फ होता. गोळ्यांच्या वर्षावामुळे पसरलेल्या केमिकल्सने भरलेला आणि रक्ताने माखलेला. आम्ही जमेल तसे बर्फ खोदून स्वच्छ करून चाटत किंवा वितळवून भूक भागवली होती. हात SLR पकडून दुखत होते. मला एके ४७ हवी होती. खाण्यापेक्षा त्याची गरज जास्त होती. ती मिळाली. मी खूश झालो. मला एका पॉइंटपासून दुसऱ्या पॉइंटपर्यंत पळायचे होते. जरा डोके वर काढले की तुफान गोळीबार होत होता. मी घाबरून जिथे होतो तिथेच उभा राहिलो. तेव्हा आमचे सुभेदार मेजरसाहेब म्हणाले, "इथेच उभा राहिलास तर हमखास मरशील. तिथे पोचलास तर कदाचित जिवंत राहून शत्रूला ठोकून काढशील. बंदूक हातात धरायला नाही शत्रूला मारायला दिली आहे." हे ऐकून माझ्या अंगात एक जोश संचारला. मी गोळ्या चुकवत नियोजित ठिकाणी पोहोचलो. आणि मग आम्ही एकत्रित हल्लाबोल करून पाकी बंकर उद्ध्वस्त केला. मी आज सुभेदार मेजरसाहेबांमुळे जिवंत आहे. कारण त्यांनी मला जिथून पळायला लावले तेथे पाकिस्तानी सैनिकांनी जोरदार गोळीबार केला पण तोपर्यंत मी दुसरीकडे पोहोचलो होतो."

आमच्या 'लक्ष्य'च्या ३६ स्वयंसेवकांना 'किती ऐकू', 'किती जणांना समजून घेऊ' असे झाले तर ४४ सैनिकांची स्थिती 'किती बोलू' आणि 'कुणाकुणाबद्दल सांगू' अशी झाली होती. २० वर्षांपूर्वी लढलेल्या युद्धाची आठवण ठेवून 'लक्ष्य फाउंडेशन'तर्फे आपला कुणी युद्धभूमीवर सत्कार करत आहे, ही भावनाच त्यांना हळवे करत होती. लष्करी वर्दीतील अलवार ओलाव्यात आम्ही सर्वजण चिंब भिजत होतो. त्या सैनिकांच्या चेहऱ्यावरील भावोत्कटता टिपणे आणि मनातील आंदोलने न्याहाळणे हे फक्त अनुभवायचे 'एखादी तरी ओवी अनुभवावी' असे! कारण ते व्यक्त करणे शब्दांच्या पलिकडले आहे.

सैनिकांचा सन्मान करणे, सातत्याने त्यांच्या करारी, निडर वृत्तीचा, कर्तृत्वाचा उद्घोष करणे, आम्ही तुमच्यासमवेत आहोत हा निरोप पोहोचवणे, ही त्यांची गरज नाही, आपली जबाबदारी आहे.

२६ जुलैला आवर्जून या सैनिकांच्या अतुलनीय व बेजोड धैर्याला प्रत्येकाने वंदन करूया. एक ज्योत त्यांच्या नावाने हृदयात पेटती ठेवूया. कारगिल युद्ध व युद्धात झालेला तारुण्याचा, यौवनाचा होम व हौतात्म्य आपण विसरता कामा नये. केवळ कारगिल युद्ध नव्हे तर स्वातंत्र्यप्राप्तीपासून लढलेली प्रत्येक लढाई व प्राप्त झालेला विजय विस्मरणात जाता कामा नये. केवळ युद्धभूमीवर नव्हे तर दहशतवादी हल्ल्यांना दिलेले प्रत्युत्तर असो, सशस्त्र सेना दले, निमलष्करी दले... देश सुरक्षित राखण्यासाठी प्राणांची बाजी लावतात. स्वेच्छेने अंगावर चढवलेल्या वर्दीची व घेतलेल्या प्रतिज्ञेची पूर्तता प्रसंगी प्राणांची आहुती देऊन पूर्ण करणाऱ्या समस्त वीरांना शुभेच्छांसहित मानाचा मुजरा!

*जान हमारी हिंदुस्थान, शान हमारी हिंदुस्थान*
*इस वतन पर हम कुर्बान, मेरा देश मेरी पहचान!*
*जयहिंद!*

Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)

WE LOVE
WHAT WE DO.

VJ | VILAS JAVDEKAR
DEVELOPERS

www.javdekars.com

Corporate Office: 306, Siddharth Towers, Sangam Press Road,
Kothrud, Pune 411038. | T: +91-20-6764 8000

BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषकः
संपादक - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे- ४११ ०३० फोन : ०२० २४४३ २४४३.

To,